बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

## विनेश फोगट अतिरिक्त वजनामुळे अपात्र

दिल्ली: पॅरिस ऑलिम्पिकच्या १२व्या दिवशी भारताला सर्वात मोठा धक्का बसला. भारताची सुवर्णपदकाची दावेदार असणाऱ्या विनेश फोगटला अतिरिक्त वजनामुळे पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधून अपात्र ठरवण्यात आले आहे. यासह भारताचे अजून एक पदक हुकले. याशिवाय भारतीय महिला टेबल टेनिस संघाला जर्मन संघाविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. यानंतर रात्री उशिरा मीराबाई चानूही वेटलिफ्टिंगच्या पदक स्पर्धेत सहभागी होणार आहे. तर भारताचा धावपटू अविनाश साबळे आज ३ हजार मी. अडथळा शर्यतीत सहभागी होणार आहे. तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये २ कांस्यपदक जिंकणारी स्टार नेमबाज मनू भाकेर देशात परतली असून विमानतळावर चाहत्यांनी तिचे जल्लोषात स्वागत केले.

बीड | गुरूवार,दि.८ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक१०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# बांगलादेशात जे झालं ते भारतातही घडू शकतं!

## अस्थिरता : सलमान खुर्शीद यांचं खळबळजनक वक्तव्य

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बांगलादेशात सध्या प्रचंड अराजक माजलं आहे, त्यामुळे हिंसाचार उसळला आहे. तसंच शेख हसीना यांना देश सोडावा लागला. शेख हसीना यांना भारताने आश्रय दिला. त्यांना पंतप्रधानपदही सोडावं लागलं आणि देशही सोडावा लागला. ही परिस्थिती असताना काँग्रेसचे नेते सलमान खुर्शीद आणि सज्जन वर्मा या दोघांनीही बांगलादेश सारखी परिस्थिती भारतात उद्भवू शकते असं म्हटलं आहे. ज्यानंतर भाजपा नेत्यांनी सलमान खुर्शीदवर जोरदार टीका केली आहे. सज्जन वर्मा यांनीही याच आशयाचं वक्तव्य केलं आहे.भारताचा शेजारी असलेल्या बांगलादेशात अराजक माजलं आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सुरु झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागलं. त्यानंतर पंतप्रधान शेख हसीना यांना देश सोडावा लागला. या घटनेनंतर बांगलादेशातील पंतप्रधान निवासात जनता शिरली आणि त्यांनी तिथे तोडफोडही केली. बांगलादेशात उसळलेल्या हिंसाचारामुळे आत्तापर्यंत ४०० हून जास्त लोकांचा बळी गेला आहे. शेख हसीना यांना भारताने आश्रय दिला आहे. या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठकही पार पडली. त्यावेळी सगळ्याच पक्षांनी सरकारला या मुद्द्यावर पाठिंबा दिला. अशात आता सलमान खुर्शीद आणि सज्जन वर्मा या दोन नेत्यांनी बांगलादेशसारखी परिस्थिती भारतातही निर्माण होऊ शकते असं म्हटलं आहे.भाजपाचे नेते अनुराग ठाकूर म्हणाले, सलग तिसऱ्यांदा काँग्रेसचा पराभव झाला. त्यामुळे काँग्रेसची मानसिकताच देशात अराजक निर्माण करण्याची आहे. भीती आणि भ्रम पसरवणं हा यांचा जुना खेळ आहे. देशाला मागे नेण्यासाठी काँग्रेस काहीही करु शकते. काँग्रेसचे नेते देशाचं नुकसान करत आहेत. देशात भीती पसरवण्याचं काम काँग्रेसकडून केलं जातं आहे. हे काँग्रेसने बंद करायला हवं. असं अनुराग ठाकूर म्हणाले.



### सज्जन वर्मा काय म्हणाले?

बांगलादेशात मागच्या दोन दिवसात काय घडतं आहे ते आपण पाहिलं आहे. बांगलादेशातील जनता पेटून उठली आहे. बांगलादेशात पंप्रधान निवासात लोक घुसले, राष्ट्रपती भवनातही लोक घुसले. एक दिवस असा येईल की मोदींच्या चुकीच्या धोरणांमुळे लोक तुमच्याही निवासस्थानात घुसतील. असं वक्तव्य सज्जन वर्मांनी केलं.

### काय म्हणाले सलमान खुर्शीद?

बांगलादेशात जे काही घडतं आहे ते भारतातही घडू शकतं. तिथे काय परिस्थिती आहे ते आपण पाहतो आहोतच. तशीच भारतात उद्भवू शकते. असं वक्तव्य सलमान खुर्शीद यांनी केलं. शिकवा ए हिंद या मुजीबुर रहमान यांच्या पुस्तकाचं प्रकाश सलमान खुर्शीद यांच्या हस्ते करण्यात आलं. ज्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं. त्यांच्याच या वक्तव्याप्रमाणे काँग्रेस नेते सज्जन वर्मा यांनी केलं.

### संबित पात्रा काय म्हणाले?

सलमान खुर्शीदच नाही तर काँग्रेसचे इतर काही नेतेही म्हणाले की बांगलादेशात जे घडलं ती परिस्थिती भारतातही उद्भवू शकते. एका पुस्तक प्रकाशनाच्या वेळी त्यांनी हे वक्तव्य केलं. भारतात हिंसाचार उसळेल, अराजक माजेल याचे संकेतच सलमान खुर्शीद यांनी दिले आहेत. काँग्रेसची विचारधारा कशी आहे? तुम्हीच बघा. देशात आग लागेल, दंगल होईल, पंतप्रधानांवर हल्ला होईल हे त्यांचेच नेते राहुल गांधी म्हणत होते. ते का म्हणत होते ते आता कळलं आहे. अशी टीका संबित पात्रा यांनी केली.

# आरक्षण हा सामाजिक मुद्दा; त्याला राजकीय वळण नको

## ॲड. प्रकाश आंबेडकर : आरक्षणाची लढाई जिंकायची असेल तर

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

आरक्षण हा सामाजिक प्रश्न आहे त्याला राजकीय वळण लागू नये. यासाठी आम्ही आधीपासून प्रयत्न करत होतो. ही आरक्षण बचाव यात्रा जेव्हा नियोजित केली, ती पक्ष म्हणून नाही तर सामाजिक जबाबदारी म्हणून राहिली पाहिजे, त्याला राजकीय वळण देऊ नका, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. औरंगाबाद येथील



आरक्षण बचाव यात्रेच्या समारोप सभेत ते बोलत होते.

आम्ही ज्यावेळी ही यात्रा काढली त्यावेळी बरीच नावे ठेवली गेली. मी गेली चाळीस वर्षे हे बघत आहे की, स्वतःला काय सुचत नाही म्हणून दुसऱ्यावर टीका केली जाते. यामध्ये आंबेडकरी चळवळीतील बांडगुळ पहिल्यांदा असतात हे लक्षात घ्या. कारण हे बांडगुळ जी आहेत ती पाकिटछाप बांडगुळ पान २ वर...

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे

## मध्यस्थी : काडीवडगाव प्रकल्प येथे बसले होते उपोषणास



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे वेतनासाठी सुरु असलेले उपोषण आ.संदीप क्षीरसागरांच्या मध्यस्थीने बुधवारी (दि.७) रोजी कर्मचाऱ्यांनी मागे घेतले.

माजलगाव बॅकवॉटर मधून बीड शहरासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे गेल्या अनेक दिवसांपासूनचे वेतन न मिळाल्याने उपोषणाला बसले होते. यावर आ. संदीप क्षीरसागर यांनी काडीवडगाव प्रकल्प येथील उपोषणस्थळी भेट घेऊन उपोषणकर्ते व प्रशासन पान २ वर...

# संपूर्ण देश तुमच्या पाठीशी उभा

## क्रीडा : विनेश-निशासाठी पोस्ट करत सचिन तेंडुलकरही भावूक



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

विनेश फोगटला पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधून अपात्र ठरवण्यात आल्याने संपूर्ण देश संतप्त झाला आहे. आज सूर्य उगवला तेव्हा देशाला विनेश फोगटकडून किमान रौप्य पदकाची अपेक्षा होती, पण भारतीय महिला कुस्तीपटू अंतिम सामना खेळू शकणार नसल्याचे वृत्त येताच सर्व देशवासियांची निराशा झाली. या बातमीने सर्वसामान्य भारतीयच नाही तर क्रिकेटचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरही निराश झाला आहे. सचिनने सोशल मीडियावर एक लांबलचक पोस्ट लिहून विनेश फोगट आणि निशा दहियाचे कौतुक केले आहे.

सचिन तेंडुलकरने एक्सवर लिहिले की, निशा दहिया आणि विनेश फोगट, तुमच्या दोघींच्या धैर्य आणि दृढनिश्चयाने संपूर्ण देशाला एक नवी प्रेरणा दिली आहे. कारण निशाचे दुखापत होऊनही इतक्या उत्कटतेने देशासाठी लढणे खरोखरच आश्चर्यकारक होते. विनेश, अपात्र ठरवूनही, तुझा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास आणि युई सुसाकीविरुद्धचा विजय विलक्षण होता. जरी आमच्या अपेक्षेप्रमाणे निकाल आले नसले, तरीही तुमची मान उंच ठेवा कारण संपूर्ण देश तुमच्या मागे उभा आहे. आम्हाला तुम्हा दोघींचा खूप अभिमान आहे.विनेश फोगटने कुस्तीच्या अंतिम फेरीत पोहोचून ऐतिहासिक कामगिरी केली होती. त्यामुळे संपूर्ण देशाला तिच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती, मात्र महिलांच्या पान २ वर...

# शाहरतील समस्या संदर्भात घेतली भेट

## डॉ.ज्योती मेटे: जिल्हाधिकारी अविनाश पाठकांना निवेदन



बीड/ पुण्यभिमी प्रतिनिधी

कला बीड शहरतिल समस्या संदर्भात मुख्याधिकारी यांना निवेदन देत बीड शहरातील समस्या सोडवण्याची मागणी डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. आज त्यांनी या विषयी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेत नागरिकांच्या समस्या मांडल्या आणि नगर पालिका प्रशासनाची नाकर्ते पणाची जाणीव करून दिली. या प्रसंगी अनिल घुमरे , सुहास पाटील, नवनाथ प्रभाळे,मनोज जाधव, पान २ वर...

# मार्टीच्या स्थापनेस मंत्रिमंडळाची मंजुरी

## धोरण : उपमुख्यमंत्री अजित पवारांचे मालने आभार

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने आज घेतलेला निर्णय म्हणजे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नांचे यश असल्याचे सांगत राज्यातील अनेक मुस्लिम तसेच अल्पसंख्यांक बांधवांच्या संस्था, संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन केले आहे.



राज्यातील मुस्लिम तसेच अल्पसंख्याक बांधवांच्या विकास योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्न व पाठपुराव्यामुळे महायुती सरकारने अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला असून त्याची कार्यवाही सध्या अंतिम टप्प्यात आहे. अल्पसंख्याक समुदायासाठी 'टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णय विचाराधीन होता. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. पान २ वर...

**आढावा** कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

# कृषी पूरक साहित्याचे वितरण तातडीने करा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले पॉवर स्प्रे पंप शेतकऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील तसेच राज्यातील पूरबाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेत नुसानभरपाई देण्याच्या अनुषंगाने नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावे, तसेच विविध योजनांसाठी वितरित करण्यात आलेला निधी शेतकऱ्यांच्या खात्यात ताबडतोब वर्ग करण्यात यावा असे आदेश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिले.

कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आयोजित



बैठकीत कृषिमंत्री धनंजय मुंडे बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती व्ही राधा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक परिमल सिंह, बाळासाहेब ठाकरे ग्रामीण कृषी विकास प्रकल्प संचालक हेमंत वसेकर, कृषी संचालक विनायकुमार आवटे, सर्व विभागीय कृषी सहसंचालक, सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा व इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यात ९९ टक्के पेरण्या पूर्ण झालेल्या असल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा माध्यमातून डीबीटी पोर्टल वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना द्यावयाचे कृषी पूरक उपकरणे, निविष्ठा यांचे वितरण त्वरित करण्यात यावे. नॅनो युरिया, डीएपी, पावर स्प्रे पंप, स्टोरेज बॅग, मेटल दिहाईड आदी साहित्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे निर्देश दिले तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भासणाऱ्या अडचणींच्या बाबत आढावा घेण्यात आला.

# अर्थसंकल्पात महाराष्ट्राला भरीव मदत मिळाली

## राम कुलकर्णी : राजकीय स्वार्थापोटी विरोधकांची बोंबाबोंब

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला एक लाख कोटी रूपये मिळाल्याचा दावा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला असुन काहीच मिळालं नाही असं म्हणत विरोधक केवळ राजकिय स्वार्थापोटी ओरड करत असल्याची टिका त्यांनी केली. वाढवण बंदराला ७६ हजार कोटी तर रेल्वे प्रकल्पासाठी १५ हजार कोटी एवढेच नव्हे तर मराठवाड्यातले सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ६०० कोटी रूपायाची आर्थिक तरतुद असल्याचे सांगत उघडा डोळे, बघा निट असं म्हणत विरोधकांना त्यांनी टोला मारला.




केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर बोलण्यासाठी प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांची पत्रकार परिषद पक्षाच्या संघर्ष योद्धा जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कामगार मोर्चाचे संयोजक ओमप्रकाश गिरी यांची उपस्थिती होती.

केंद्र सरकारने सामान्य माणसाचं हित आणि देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला. उत्पादन वाढ करताना गरिब माणसाचा विचार ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतुन एक कोटी घरं, गरिबाच्या मुलांनी शिक्षणात पुढे गेले पाहिजे यासाठी नाममात्र पान २ वर...

# एक 'बांगला' बने न्यारा

बांगलादेशातील घडामोडींवर 'वंगदेशी विद्यार्थ्यांचा विद्रोह' (२२ जुलै) या संपादकीयात विद्यार्थ्यांची वावटळ शमणे अवघड असल्याचे भाकीत केले होते. तसेच झाले. या विद्यार्थ्यांनी अखेर पंतप्रधान बेगम शेख हसीना यांनाच पदच्युत केले आणि जीव वाचवण्यासाठी या बेगमेस देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. जे झाले त्यात आश्चर्य वाटावे असे काही नाही. आपले सर्व काही उत्तम चाललेले आहे आणि आपल्या धोरणांमुळे देशाचेही उत्तम चालू आहे असे मानणारे स्वमग्न सत्ताधीश लोकशाहीचा अभाव असेल तर याच मार्गाने सत्ताच्युत होतात. लोकशाही नसेल तर आपले काय चुकते हे सांगणारे ना विरोधक असतात ना माध्यमे ते करू धजतात. त्यात विकासाचा फुगा फुगवलेला असेल तर काही बोलायचीच सोय नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याप्रमाणे शेख हसीना यांनी आपल्या हुकूमशाही धोरणांच्या जोरावर काही आर्थिक विकास घडवून आणला खरा. पण अशा दमदाटीने होणारा विकास तकलादू असतो आणि समाजातील सर्वांच्या गरजा भागवण्यास पुरेसा नसतो. हे सर्व बांगलादेशात दिसून येत होते. पण आपल्या सिंहासनाखाली लागलेल्या आगीची दखल घेण्याचे शहाणपण पंतप्रधान शेख हसीना यांनी दाखवले नाही. अखेर विद्यार्थ्यांच्या विद्रोह वणव्यात त्यांनाच पदच्युत व्हावे लागले. या सगळ्याचे संदर्भ अनेक आहेत.उदाहरणार्थ या उद्रेकात चीन वा इस्लामी धर्मातिरेक्यांची भूमिका. बांगलादेशातील घडामोडींविरोधात विद्यार्थी भले उघडपणे व्यक्त झाले असतील. पण त्यांनी तसे व्यक्त व्हावे यासाठी त्यांना कोणाचेच उत्तेजन नव्हते असे मानणे अवघड. या संदर्भात चीन आणि इस्लामी धर्माभिमानी या दोघांवर संशयाची सुई रोखली जाते. यात चीनचा संशय अधिक घेण्यास जागा आहे. कारण शेख हसीना आणि चीन यांच्यातील संबंधांत तणाव निर्माण झालेला होता आणि अवघ्या काही आठवड्यांपूर्वीच बेगम साहिबांवर आपला चीन दौरा अर्ध्यावर सोडून येण्याची वेळ आली होती. त्यांच्या चीन दौऱ्यात अध्यक्ष क्षी जिनपिंग हे शेख हसीना यांना भेटलेही नाहीत. या दौऱ्यात चीनने त्यांची तशी उपेक्षाच केली. त्यामुळे दौरा अर्ध्यावर सोडून मायदेशी परतण्याचे टोकाचे पाऊल हसीना यांस उचलावे लागले. त्यानंतरही चीनने संबंध सुधारासाठी काही प्रयत्न केले नाहीत. हसीना यांची चीनपेक्षा भारतावर अधिक भिस्त होती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे संबंध अत्यंत सौहार्दाचे होते. भारतीय उपखंडात आपल्या हितसंबंधांत कोणी वाटेकरी झालेले चीनला चालत नाही. बांगलादेशातील उद्रेकास चीनची फूस असू शकते असे मानण्यामागे हे एक कारण असू शकते. तसे ते असेल तर मग या साऱ्यात खुद्द बांगलादेशी सरकारने आणि त्या देशाचा मित्र, हितरक्षक अशा भारताने अधिक सजग असणे आवश्यक होते. त्या देशातील वाढत्या भारत प्रभावाविरोधात चीन बघ्याची भूमिका घेणार नाही हे उघड होते. तेव्हा आपल्या देशातील नाराजीचा उद्रेक हाताबाहेर जाणार नाही याची खबरदारी शेख हसीना यांनी घ्यायला हवी होती आणि चीनच्या संभाव्य कुरापतीविरोधात त्यांना सतर्क करण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी होती. यातील पहिल्याबाबत त्या किती निष्प्रभ ठरल्या, ते स्पष्टच आहे. दुसऱ्याबाबतचा तपशील उपलब्ध होणे अवघड. तथापि बांगलादेश सोडताना त्यांना आपल्या हवाई दलाने कशी सुरक्षा दिली वगैरे अनावश्यक शौर्यकथांत काही अर्थ नाही. कारण त्यांच्या जिवास अपाय करण्यात चीनला रस नव्हता. त्यांना सत्ताच्युत करणे चीनसाठी पुरेसे होते. ते झाले.गेल्या जवळपास तीन दशकांतील दोन दशके बांगलादेशावर शेख हसीना यांनी राज्य केले. विरोधकांच्या मुसक्या आवळणाऱ्या या देशातील लोकशाही केवळ नावापुरती होती आणि शेख हसीना यांच्या सत्तेस लष्कराचाही आशीर्वाद होता. 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी' या प्रमुख विरोधी पक्षाने बहिष्कार घातलेल्या निवडणुकीत शेख हसीना यांना यंदाच्या जानेवारीत पुन्हा सत्तासंधी मिळाली आणि तो देश शब्दश: एकपक्षीय लोकशाही बनला. दरम्यानच्या काळात खरे तर हसीना यांच्या धोरणांनी आर्थिक विकासास चांगली चालना मिळालेली होती. तयार कपड्यांच्या कारखानदारांचे जागतिक केंद्र बनल्याने बांगलादेशात महिला रोजगारात लक्षणीय वाढ झाली आणि मानव्य विकास निर्देशांकही चांगलाच सुधारला. पण तीत सातत्य राखता आले नाही. आर्थिक विकास ही सततची प्रक्रिया असते. त्यात एकदाच आघाडी घेऊन चालत नाही. मिळालेली आघाडी टिकवणे महत्त्वाचे असते. ते हसीना यांस जमले नाही. या पार्श्वभूमीवर त्या देशातील जुन्या आरक्षण धोरणाच्या कढीस न्यायालयीन निकालामुळे पुन्हा उकळी आली आणि संतप्त विद्यार्थी रस्त्यावर उतरले. जवळपास ३०० जणांची हत्या आणि १० हजारांहून अधिकांस तुरुंगात धाडूनही विद्यार्थ्यांचा आक्रोश शांत होईना. कसा होणार? या १७ कोटींच्या देशात २० लाखांहून अधिक बेरोजगार आहेत आणि आटत्या सरकारी नोकऱ्यांत ७५ टक्क्यांच्या आसपास आरक्षण. यामुळे विद्यार्थी संतापले. त्यातून हे पुढचे रामायण घडले. त्यानंतर बांगलादेशी लष्करप्रमुखांनी हंगामी सरकार स्थापनेची घोषणा केली खरी.

# अनुसूचित जाती -जमातीचे उपवर्गीकरण

नुकताच अनुसूचित जाती जमाती आरक्षण उपवर्गीकरण करण्यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय संविधानाच्या किती अधिन आहे पाहू. अनुसूचित जाती जमाती मध्ये आरक्षणाची उपवर्गीकरण करण्यास या निर्णयाने राज्यांना परवानगी दिली आहे. ते देत असताना घटनेतील कलम १४ चा उल्लेख केला जातो किंवा ७ सदस्यीय घटनापीठाने केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ मध्ये कायद्यासमोर समानता किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण प्रदान करतो.राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही.असे कलम १४ मध्ये सांगितले आहे. आता कलम १४ नुसार उपवर्गीकरण समानता आणण्यासाठी असे म्हणावे? म्हणजे याचा अर्थ अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये समानता नाही किंबहुना नव्हती असा निष्कर्ष या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून लक्षात येतो. मुळात तसेच जाती आणि जमाती यांना असलेले आरक्षण हे असंवैधानिक होते का?असा प्रश्न निर्माण होतो. तर या जातीमध्ये समानता नव्हती तर मग अनुसूचित जाती जमातीचा समुह चुकीचा होता का? हे सगळे प्रश्न उपस्थित करून संविधानाच्या विरोधात आहे असे लक्षात आले नाही तर नवल ७ सदस्यीय घटनापीठाने दिलेल्या निर्णयात एका न्यायाधीशांनी हा निर्णय घटनाविरोधी असल्याचे



म्हटले आहे.सहा विरुद्ध एक असा हा निर्णय. अनुसूचित जाती जमाती मधील सुचित केलेल्या कुठल्याही जातीला कुठलीच जात आरक्षणाचा फायदा होऊ नये असे सुचित करीत नाही. भले त्यांचा धर्म वेगवेगळा असो. मग हा जाणुन बुजुन भेदभाव निर्माण करण्याचा प्रयत्न नव्हे काय? सवर्ण हिंदू आणि अस्पृश्य यांच्यातील जातीभेद कायद्याने जातीभेद नष्ट झाला असताना हा पुन्हा जाती अंतर्गत भेद निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. म्हणजे कलम १४ चे उल्लंघन करण्यास एकप्रकारे न्यायालयने दुजोरा दिला आहे.या घटनापीठातील ६ न्यायाधिशांच्या निर्णयाला असहमती दर्शविली आहे ती न्यायाधीश बेला त्रिवेदी यांनी. त्यांनी म्हटले आहे की, संविधान राष्ट्रपतींनी सुचित केलेल्या अनुसूचित जाती –जमातींमधील विशेष जातींना अलग कायदा करून आरक्षण देऊ शकत नाही. तसेच, न्यायाधीश त्रिवेदी म्हणतात राज्यांनी केलेलं जातीचं उपवर्गीकरण भेदभाव आणि अनुच्छेद १४ च उल्लंघन आहे. अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करून समुह करण्याचा अधिकार राज्य विधीमंडळाला नाही असे त्रिवेदी यांचे मत.बेला माधुर्या त्रिवेदी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी, नरेंद्र मोदी तत्कालीन मुख्यमंत्री असताना गुजरातमधील मोदी सरकारच्या कायदा सचिव म्हणून त्यांनी काम केले.त्यानंतर २०१६ ते २०२१ या कालावधीत त्या गुजरात उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश होत्या. त्यांनी यापूर्वी १७ फेब्रुवारी २०११ ते २७ जून २०११ या कालावधीत गुजरात उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून काम केले.१९९६ मध्ये त्यांची लिम्का बुक ऑफ रिकॉर्ड्स मध्ये नोंद आहे.बुक ऑफ रिकॉर्ड्स मध्ये नोंद होण्याच कारण म्हणजे वडील आणि मुलगी एकाच न्यायालयात न्यायाधीश होते. विशेष म्हणजे सिव्हिल आणि संविधानिक यांच्याशी संबंधित त्यांनी न्यायदान केले आहे. संबधित विषयाशी त्या जोडल्या गेल्या आहेत.उमर खालिदची जामीन याचिका . बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायदा (युएपीए) १९६७ च्या तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिका . कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार ४ यांच्याविरुद्ध बेहिशोबी मालमत्तेच्या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण ब्यूरोच्या (सीबीआय) चौकशीशी संबंधित याचिका सर्वोच्च न्यायालयाने आप नेते सत्येंद्र जैन यांना जामीन नाकारला आदी महत्वाची प्रकरणं त्यांनी हाताळली आहेत.विरोधी पक्षांची संवेदनशील प्रकरणे त्यांनी हाताळली आहेत. हे महत्वाचं.भारतीय राज्यघटना ही सर्वोच्च कायदेशीर प्राधिकरण आहे जी सरकारच्या विधायी, कार्यकारी आणि न्यायिक अवयवांना बांधते. संविधानाने सर्व नागरिकांना मूलभूत अधिकार दिले आहेत आणि स्वतंत्र न्यायव्यवस्थेला संविधानाचे उल्लंघन करणारे कायदे किंवा सरकारी कृती अवैध ठरवण्याचा अधिकार दिला आहे. मात्र,या निर्णयामुळे खुद्द न्यायालयानेच संविधानाचे उल्लंघन केले आहे.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

# अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्थापना!

## राजेश घोडे : सादोळा सर्कल अध्यक्षपदी अमीन शेख



माजलगाव/पुण्यभिमी प्रतिनिधी

आज दिनांक सहा ऑगस्ट २०२४ रोजी आझाद क्रांती सेनेचे मुख्य कार्यालय माजलगाव येथे उच्चशिक्षित आमीन शेख नावाच्या तरुण तडफदार युवकांची सादोळा सर्कल अध्यक्षपदी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे, कैलास गायकवाड ,व राहुल गायकवाड यांनी निवड केली, या निवडी दरम्यान सादोळा सर्कल मधील प्रत्येक गावागावांमध्ये जाऊन आपण आझाद क्रांती सेनेचा विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं कार्य व संघटन बांधण्याचे काम कराल व महापुरुषांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचण्याचं काम करून शोषित वंचित उपेक्षित समाजाला न्याय समता स्वातंत्र्य बंधुत्व वरील आधारित देशाचे संविधान देशाची लोकशाही व अखंडता कायम अभाधित राखण्यासाठी जागृतीचा अग्निकुंड हमेश तेवत ठेवाल अशी अपेक्षा आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी शुभेच्छा प्रसंगी बोलून दाखवली अमीन शेख हे उच्च शिक्षित असून ते समाजाला नक्कीच न्याय देतील असे या वेळी मत व्यक्त केले व अमन शेख यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

## पान सह वरून

### पंचशीलाच्या पालनातच

उपस्थित राहून धम्मदेश नेचा लाभ घ्यावा असे आवाहन सदधम्म सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन ड. दशरथ मकसरे यांनी केले. तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी भगवान सातपुते पांडुरंग जाधव, एम.बी चांदमारे, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, सौ.विद्याताई निसर्गंध, सौ. बबीताताई सावंत,सौ. इंदुमती खळगे, आदी उपस्थित होते.

### वीरशैव स्मशानभूमीत

तसेच, दोन खोल्यांचे बांधकाम करण्याची मागणी केली होती. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांनी तत्काळ वीरशैव स्मशानभूमीत दोन खोल्यांचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन केले. या कामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे, अशोक चिपाडे, शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, बाळूशेट मिटकरी, अनिल मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, नागेश मिटकरी, पशुपती मिटकरी, दिनेश राजमाने, अमर ढेपे, अनंत शहागडकर, अमोल होनराव, अमोल गलधर, ज्ञानेश्वर राऊत, साजेद जागीरदार, भारत शेटे, सुरेश कानडे, दिनेश राजमाने, शुभम कुलथे, दिलीप ढेपे, चंदू विभुते, अनंत शहागडकर, महारुद्र घेवारे, महेश डोंगरे, श्रीकृष्ण पताळे, सोमनाथ कानडे, सचिन रेगुडे, रवींद्र कानडे, बाळू स्वामी, योगेश बारस्कर, अमित कानडे, विद्याभूषण बेदरकर आदी उपस्थित होते.

### केज बसस्थानकात

महामार्गावरून लांब पल्ल्याच्या बस गाड्या जा ये करतात त्यामुळे ग्रामीण भागापासून गाडी बदलणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहिली तर दररोज हजारोंच्या घरात जाते त्यामुळे बस देखील अपुऱ्या पडतात. या बसस्थानकावर अनेकदा महिलांचे दागिने चोरी, पर्स चोरी, पाकिटमारी अशा सतत घटना घडलेल्या आहेत. असे असतांना देखील या बसस्थानकावर एसटी महामंडळ असो की, केज पोलिस असोत या संदर्भात कसलीच काळजी घेत नाहीत. रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी अमावास्या असल्याने या बसस्थानकावरून बीड मार्गे धावणाऱ्या गाड्या मधून बीड तालुक्यासाठी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे दर्शनासाठी जाण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती परंतू ही गर्दी पाहून गाड्या मात्र वेळेत मिळून आल्या नसल्याने प्रत्येक गाडी येताच गाडीत चढण्यासाठी प्रवाशांची एवढी गर्दी झाली होती की, एक एका बस मधून शंभरच्या आसपास प्रवासी नेण्यात आले. या गर्दीचा फायदा घेवून गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनी देखील गर्दीत शिरण्याचा प्रकार केला. तसे हस्तकौशल्यही दाखवले पण एका भाविकाच्या पिशवीतून मात्र त्याच्या नशिबाला चुन्याची डब्बी, सुपारी अन् अडकिता हाती लागला असल्याचे प्रवाशांमधून सांगण्यात आले. या खेरीज किती घटना घडल्या असतील हे समोर आले नाही मात्र एसटी महामंडळाच्या अपुऱ्या पडणाऱ्या गाड्या, प्रवाशांना एसटी आणि पोलिसांकडून न मिळणारे संरक्षण हेच गुन्हेगारांना फायद्याचे ठरत असल्याच्या प्रतिक्रिया मात्र प्रवाशांनी व्यक्त केल्या.

### मुजमुलेची सामान्य कुटुंबातून

घेण्यात आलेल्या परीक्षेत अभिलेखापाल पदी त्याची निवड झाली. अभिजीतने हे यश आपल्या अभ्यासातील सातत्य, चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.ते पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांचे लहान बंधू आहेत.

### परळी विधानसभा निवडणूक

देशाचे जाणते राजे व राजकारणातील भिष्माचार्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी कडून निवडणूक लढविण्याचा निर्धार राजेभाऊ फड यांनी व्यक्त केला आहे. काल मुंबई येथे महाविकास आघाडीच्या नेत्यांची भेट घेवून निवडणुक लढविण्याबाबत सखोल चर्चा झाली असल्याचे राजेभाऊ फड यांनी सांगितले.

### कपाशीवर मर रोगाचा

जरंडी ठाणा फरदापुर तांडा आदी भागात पाहणी करून शेतकऱ्यांना उपाय योजना व मार्गदर्शन केले यावेळी शास्त्रज्ञ सी बी पाटील, तालुका कृषी अधिकारी मदन शिदोदिया पंचायत समिती कृषी अधिकारी संतोष भालेराव कृषी पर्यवेक्षक रमेश गुंडीले,शेकणाथ भालेराव, समाधान चौधरी, भाऊसाहेब चौरे व पंचक्रोशीतील शेतकरी बांधव भालेराव, आदींनी सोयगाव परिसरात पाहणी केली आहे

### मोबाईल गेम्स, रम्मीचा जुगार

खर्च होत आहे.ततर महाराष्ट्रातील किती रिचार्ज होत असेल असाही सवाल सरपंच आण्णासाहेब येवले यांनी उपस्थित केला आहे. मोबाईल चे व्यसन हा राष्ट्रीय समस्या समजुन केंद्र व राज्य सरकारने मोबाईल वरील सर्व गेम्स व रम्मीचे गेम्स व लहान मुलांचे खेळ तसेच अन्यही जुगाराचे गेम्स बंद करावेत.अशी राष्ट्रहिताची मागणी डोंगरकिन्ही येथिल युवा सरपंच आण्णासाहेब येवले यांनी केली आहे.

### महादेव मंदिराचे पुरातत्वीय

त्यात स्तंभावरील घंटांचा आकार लक्ष वेधून घेतो. चालुक्यकालीन उत्कृष्ट मंदिराची सर्व लक्षणे या मंदिरात दिसून येतात. मंदिरातील दर्शनीय भाग आणि आंतरिक भाग हा शिल्पांनी सजलेला असलेला असला तरी मागील भागावर मात्र शिल्पकलेचा अभाव जाणवतो. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंके यांनी एका पत्रकाद्वारे पुरातत्वखात्याला या मंदिराच्या उत्खरणासोबतच मंदिराभोवती सुशोभीकरण करण्याची मागणी केली असून लवकरच एका शिष्टमंडळातर्फे केंद्र शासनाच्या पुरातत्व खात्याच्या संचालकास इतिहास परिषदेच्या वतीने भेटणार असल्याचेही ते म्हणाले.

## पान एक वरून

### आरक्षण हा सामाजिक मुद्दा; त्याला

असल्याची टीकाही ड. आंबेडकरांनी या वेळी केली. ॲड. आंबेडकर म्हणाले की, आपल्याला इथून पुढे लढाई जिंकायची असेल, तर आपल्याला १०० ओबीसी आमदार निवडून आणावे लागतील. आरक्षणाच्या संदर्भात राजकीय पक्षांनी भूमिका न घेतल्याने समाजानेच भूमिका घेतल्या आहेत. आरक्षणाच्या संदर्भात राजकीय पक्षांनी भूमिका घेतली असती तर गावागावांतील समाजात फूट पडली नसती. मी खात्रीने सांगतो की, जरांगे पाटील यांनी जरी म्हटलं की, मी निवडणूक लढतो तरी हे राजकीयच भांडण असेल, सामाजिक होणार नाही. या आरक्षण बचाव यात्रेचे फलित काय असेल, तर छगन भुजबळ म्हणाल्याप्रमाणे १९७७ ची परिस्थिती आणि शरद पवार म्हणाल्याप्रमाणे मणिपूरसारखी परिस्थिती इथे होऊ शकत नसल्याचेही आंबेडकर म्हणाले.जरांगे पाटील यांना जेव्हा मी भेटलो तेव्हाही त्यांच्या मागणीला माझा पाठिंबा नव्हता आणि आजही नाही. मी तेव्हाही सांगत होतो की, तुम्ही ज्या पद्धतीने आरक्षण मागत आहात त्या पद्धतीने मिळणारच नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न मंडल आयोगामध्ये आला होता तेव्हा मराठा समाजातील जो वर्ग होता तो फरक करायला तयार नव्हता. जरांगे पाटील यांना निवडणुकीत भाग घेऊद्या. ती चांगली गोष्ट असेल महाराष्ट्र १६९ कुटुंबातून मुक्त होईल असे ड. आंबेडकरांनी नमूद केले.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांचे

यांच्यात मध्यस्थी करत कर्मचाऱ्यांना उपोषण मागे घ्यायला लावले. उपोषणकर्त्या कामगारांच्या मागण्या शासनदरबारी लावून धरू व त्यांना न्याय मिळवून देऊ असे आ. क्षीरसागर यांनी उपोषणकर्त्यांना आश्वस्थ केले. यावेळी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, संबंधित विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

### संपूर्ण देश तुमच्या पाठीशी

५० किलो कुस्तीच्या अंतिम फेरीपूर्वी केवळ १०० ग्रॅम वजन जास्त आढळल्याने तिला अपात्र ठरवण्यात आले. या बातमीने विनेश फोगट धक्काच बसला आणि तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. विनेशने रात्रभर वजन कमी करण्याचा खूप प्रयत्न केला पण यश मिळू शकले नाही. वजन कमी करण्यासाठी तिने रात्रभर जोमाने व्यायाम केला. तिने तिचे केसही कापले पण तिचे वजन ५० किलोपर्यंत खाली आणता आले नाही.तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की जर एखाद्या कुस्तीपटूचे वजन त्याच्या वजन श्रेणीपेक्षा जास्त असेल तर त्याला त्या पातळीवर आणण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. विनेशच्या शरीराचे वजन जास्त होते आणि तिला ५० किलोपर्यंत पोहोचण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. यूडब्ल्यूडब्ल्यू निमंत्रण टूर्नामेंटमध्ये दोन किलोची सूट देते परंतु ऑलिंपिक, वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि आशियाई चॅम्पियनशिपमध्ये हा नियम लागू होत नाही. त्यामुळेच वजन कमी करण्यासाठी खेळाडूंना एक–दोन दिवस अन्न–पाण्याशिवाय राहावे लागते.

### शाहरतील समस्या संदर्भात

बाळासाहेब मस्के, पंडित शेंडगे,नामदेव धांडे, सुनील थोरात, हरीश शिंदे आदी. उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या जाणून घेऊन त्या समस्यांचे निराकरण करणे हे नगरपालिकेचे संविधानिक जबाबदारी असून बीड नगरपालिका यामध्ये सपशेल अपयशी ठरल्याचे दिसत आहे. या समस्या ऐकून घेण्यासाठी नगर पालिका प्रशासन आणि मुख्याधिकारी यांना वेळ नाही . तेव्हा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनीच या प्रश्र्नी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

### मार्टीच्या स्थापनेस

राज्यातील महायुती सरकारमध्ये अल्पसंख्याक बांधवांची बाजू भक्कमपणे मांडण्याची तसेच त्यांच्यासाठी विकासयोजना तयार करण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने पार पाडत आले आहेत. त्यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४–२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची घोषणाही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तत्पूर्वी, यावर्षी, ११ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णयही त्यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला आहे.अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी एकूण ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संस्थेच्या आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

### अर्थसंकल्पात महाराष्ट्राला

व्याजदरावर दहा लाखाचं कर्ज, आयकरामध्ये नोकरदारांच्यासाठी चांगला निर्णय एवढेच नव्हे तर देशातील राज्य सरकारला पंधरा वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देणार याचाच अर्थ विकास योजना राबवण्यासाठी प्रोत्साहन देणार. सामान्य लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सरसारख्या रोगावरील औषधांच्या किमती कमी केल्या तर हिंदु, बौद्ध, जैन धर्मस्थळांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद केली. बेरोजगारी हटवण्यासाठी देशातील युवकांना कौशल्य विकास उपक्रम हाती घेवुन रोजगार निर्मिती कशी करता येईल हा विचार देखील यात आहे. स्पर्धेच्या युगात इलेक्ट्रॉनिक वहाने, सौरऊर्जा त्यासाठी दिलेली सवलत एवढेच नव्हे तर देशातील शेतकर्यांचे उत्पादन वाढले पाहिजे त्या दृष्टीने शेतीपुरक योजना राबवणे असतील किंवा अवजाराच्या किंमती स्थिर ठेवणे असेल या गोष्टीला प्राधान्य दिलं. अनेक वस्तुवरील कस्टम ड्युटी कमी केल्याचा परिणाम सोन्या चांदीचे भाव कालच पाच हजारांनी उतरले. संरक्षण किंवा इतर देशातील मुलभुत सुविधा यासाठीही कोट्यावधी रूपये आर्थिक तरतुद करण्यात आली. आपल्या देशाच्या भविष्यावरही मोठी गुंतवणुक करणारा अर्थसंकल्प ज्यामध्ये शेतकरी, महिला, युवा, गरिब चार घटक वर्ग डोळ्यासमोर ठेवले. तरूणांच्यासाठी केंद्र सरकारही आता ॲप्रेंटिस योजना हाती घेणार आहे. १०० नविन क्लस्टर तयार करण्याचा घेतलेला निर्णय ज्यामध्ये उत्पादन, आयटी सेवा या सर्व क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल.

विरोधक महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही म्हणून केवळ राजकिय स्वार्थापोटी खोटं बोलत आमच्या विरोधकांनी सुरू केलेला तमाशा बिनपैशाचा असुन एक कोटी पेक्षा जास्त महाराष्ट्राला निधी मिळाला. तरी एक रूपाया मिळाला नसल्याची ओरड विरोधक केवळ बदनामीसाठी करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. मुंबई, पुणे–नागपूर मेट्रोसाठी २४०० कोटी रूपये, इंडस्ट्रिअल कोरीडॉर ४९९ कोटी, नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रोजेक्ट १५० कोटी, नदी पुनर्विकास ५०० कोटी, मुळा–मुठा नदी पुनर्विकास ६९० कोटी, ग्रामीण रस्ते ४०० कोटी, सर्व समावेशक इकॉनिमिक कोरीडॉर ४६६ कोटी, आरोग्य सेवा आणि पोषण आहार ३२०० कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २५०० कोटी मंजुर इतर सुविधांना देखील करोडो रूपये मंजुर केले. तरी सुद्धा विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# महिला बनली मंत्र्यांची लाडकी बहीण

## दिलासा : थेट मंत्रालयातून आला फोन, खात्यात एक रुपया जमा!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी ता

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील ३८ वर्षीय महिलेला थेट मंत्रालयाच्या महिला व बाल विकास विभागातून बुधवारी एक वाजता फोन येऊन तुमच्या खात्यात लाडकी बहिणीच्या बँक खात्याच्या तांत्रिक पडताळणी साठी एक रु टाकला आहे ते तपासणी करा असे त्या कॉल वरून सांगण्यात आल्या मुळे जरंडी येथील मीना बाई माधव मोहिते (वय ३८) या राज्याच्या मुख्यमंत्र्याची लाडकी बहीण ठरल्या आहे

सोयगाव तालुक्यत लाडकी बहीण पोर्टल वर १६ हजार ९२२ ऑनलाइन अर्ज दाखल झालेल्या पैकी तालुका समिती ने १६ हजार ३२७ ऑनलाइन अर्जाना मंजुरी दिली त्यापैकी १५,२७० अर्जाना जिल्हाधिकारी पोर्टलवर मंजुरी देऊन सदर नावे महिला बाल विकास सदस्य सचिव यांच्याकडे पाठविण्यात आल्या वर बुधवारी दुपारी एक वाजता मिनाबाई मोहिते या महिलेला



थेट मंत्रालयाच्या महिला व बाल विकास विभागातून कॉल येऊन खाते तपासणी करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या त्यामुळे जरंडी च्या मिनाबाई माधव मोहिते या राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या लाडकी बहीण ठरल्या आहे रक्षा बंधनला पात्र ठरलेल्या सर्व महिलांच्या खात्यावर दोन हप्त्याच्या तीन हजार रु वर्ग होणार आहे त्या आधी काही निवडक महिलांच्या बँक खात्याची तांत्रिक पडताळणी बुधवार पासून सुरू करण्यात आली आहे यामध्ये सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील एकमेव महिलेला एक रु चा बल्क पोस्टिंग संदेश येऊन बँक खात्यात पहिला एक रु जमा झाला आहे त्यामुळे तालुक्यातील जरंडीची महिला लाडकी बहीण झाली आहे

सोयगाव तालुक्यातील लाडकी बहिण योजनेचा पहिल्या टप्प्यात काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे तालुका स्तरीय समितीने १६ हजार ३२७ महिलांची अर्ज वैध केली आहे सहाशे महिला योजनेसाठीअवैध ठरल्या आहे यापुढेही येणाऱ्या अर्जाची छाननी सुरू आहे आता पुढील प्रक्रिया महिला बाल विभाग सदस्य सचिव यांची आहे

–मनीषा मेने तहसीलदार सोयगाव

शेतात पिकांना खत देत असताना अचानक माझ्या मोबाईल वर फोन येवून मंत्रालयातुन सदस्य सचिव विभागातून बोलतोय तुमच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचा तांत्रिक पडताळणी साठी एक रु वर्ग केला आहे बँकेच्या खाते तपासणी करा असे सांगण्यात आले


–मिनाबाई मोहिते लाभार्थी,महिला जरंडी

सोयगाव तालुक्यातील वैध अर्ज ठरलेल्या महिलांच्या खात्याची तपासणी साठी शासनाने एक रु खात्यात वर्ग करून बँक खात्याची तपासणी सुरू आहे ज्या महिलांच्या खात्यात एक रु जमा होणार नाही त्यांची खात्याची अडचण दूर करण्याचा सूचना सदर खातेदार महिलेला देण्यात येतील परंतु अद्याप पोर्टलवर ही सुविधा उपलब्ध नाही

दीपक म्हेत्रे,प्रकल्प अधिकारी महिला व बाल विकास सोयगाव

# कॅनरा बँकेचा अजब गजब कारभार

## बोंबला : लाडकी बहीणीला खाते उघडण्यासाठी भुर्दंड



पाथर्डी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य भर गाजत असलेल्या लाडकी बहीण योजनेसाठी पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील कॅनरा बँक खात्यात मध्ये चक्क खाते उघडण्यासाठी १०००रुभरावे लागत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे

या विरोधात करंजी येथील सामाजिक कार्यकर्ते छानराज क्षेत्रे यांनी अ नगर जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे करंजी कॅनरा बँक खाते उघडण्यासाठी सक्तीने १०००रु भरण्यासाठी सांगितले जाते पचलित कायदा नुसार कुठलेही रक्कम न भरता खाते उघडले जाते परंतु कॅनरा बँकेचा चा शाखा व्यवस्थापक हा मनमानी पद्धतीने बोलणे व १००० रु सक्तीने घेण्याचे सांगतो अशा मुजोर व्यवस्थापक वर कारवाई साठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते छानराज क्षेत्रे गणेश अकोलकर अशोक अकोलकर योगेश क्षिरसागर अनिल अकोलकर आदी चा सह्या आहेत शाखाधिकारी यांच्या वर लवकरात लवकर कारवाई करावी अशी मागणी करंजी परिसरातील लाडक्या बहिणीकडून होत आहे

# बीडमध्ये वीज संबंधीचे प्रश्न सोडवा!

## तत्परता : आ. संदीप क्षीरसागरांची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीच्या असलेल्या नागरिक, शेतकरी यांच्यासाठी महत्वपूर्ण असलेले सर्व प्रलंबित व प्रस्तावित विषय मार्गी लावन्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन जोडणी, विविध योजनेंतर्गत रोहित्र तसेच तत्सम साहित्य मागणीचे प्रस्तावांचा तात्काळ निपटारा वीज वितरण कंपनी कडून करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुक्यातील वीज वितरणासंबंधी शेतकरी आणि नागरिकांच्या अनेक मागण्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाली येथील मंजूर असलेल्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे अद्यापपर्यंत काम सुरु झालेले नाही. तसेच म्हाळसजवळा, नामलगाव, पिंपळवाडी, बेलुरा येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे कामही पूर्ण झालेले नाही. याबाबत परिसरातील गावातील नागरिक या उपकेंद्राचे काम पूर्ण करून सदरील उपकेंद्र लवकरात लवकर कार्यरत करावे अशी मागणी करत आहेत. बीड मतदारसंघात शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तसेच नवीन रोहित्र देण्यात यावे. ज्याठिकाणी शेतीपंपासाठी नवीन वीज कनेक्शन देण्यात आले आहे, त्याठिकाणी ओव्हरलोड मुले रोहित्र जळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. अशा ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. यासोबतच मतदारसंघातील विविध निकषपात्र ठिकाणांवर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या आर.डी.एस.एस. व एन.एस.सी. योजनेंतर्गत प्रातवित कामांना मंजुरी देऊन तात्काळ कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी वीज वितरण कंपनीकडे केल्या आहेत.

# मुत्य पावलेल्या ड्रायव्हरच्या कुटुंबियांना मदत

## माणूसकी : जय संघर्ष ग्रुपचा आदर्शवत उपक्रम

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव हरेश्र्वर येथील जय संघर्ष ग्रुप चे पदाधिकारी कै गजानन पोतदार यांचे अकास्मात निधन झाले होते तरी घरचा कर्ता पुरुष वारला त्यांमुळे जय संघर्ष ग्रुप संस्थापक अध्यक्ष श्री संजय माणिकराव हाळनोर यांच्या संकल्पनेतून उदयास आलेली जय संघर्ष वाहन चालक चालक मालक संघटना–संस्था महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष अध्यक्ष प्रविणभाऊ वाघ,सोयगाव तालुका अध्यक्ष राजेंद्र बडक,धनराज महाले,आधार देशमुख,रहेमान तांबोळी,संदीप धनगर राहुल धनगर,चेतन हटकर, समाधान हटकर,गजू मोबाईल निळकंठ पाटील,किरण परदेशी, भटू पवार,अशोक पाटील,टिपू पठाण,अनिकेत फरकांडे,संजय फरकांडे,कैलास बडगुजर,शुभम बडवे,गौरव



शैले,सुभाष मराठे,प्रितेश जैन,राजेंद्र पाटील, दिपक गव्हाणे,आणि ग्रामपंचायत सदस्य कोमलिसिंग देशमुख,कैलास आप्पा क्षीरसागर,मिलिंद तात्या देव,पत्रकार दिपक मुलमुले, पत्रकार राजू ठाकूर,भूषण कासार,अंतिम महाजन,आणि पोलीस अधिकारी भारत भाऊराव पाटील यांच्या समक्ष स्वर्गवासी कै गजानन गोविंदा पोतदार यांच्या परिवारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून जय संघर्ष वाहन चालक चालक मालक संघटना व संस्था महाराष्ट्र राज्य तील चालक–मालक यांच्या आर्थिक मदतीतून निधी उभारून आमच्या परिवारासाठी सहकार्याची भूमिका दाखवत जमा झालेली रक्कम ग्रामस्थ आणि पिंपळगावहरे चे पोलीस स्टेशन चे कर्मचारी भारत भाऊराव पाटील यांच्या समक्ष परिवाराकडे (८०२४५) रू कै.गजानन गोविंदा पोतदार यांचे लहान बंधू दिपक गोविंद पोतदार, मुलगा कृष्णा गजानन पोतदार,मुलगी सायली गजानन, पोतदार वडील गोविंद बंडू पोतदार,यांचेकडे सुपूर्द करण्यात आली व जय संघर्ष ग्रुप तर्फे कै,गजानन पोतदार यांच्या स्मरणार्थ दहा फुटाचे वडाचे झाड,लोखंडाची जाळी सह मुक्ताभवानी मंदिर परिसरात झाड लावण्यात आले त्याबद्दल पोतदार कुटुंबियांनच्या वतीने दिपक गोविंद पोतदार जय संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्य व सर्व वाहन चालक मालक,यांचे मनापासून आभार व्यक्त केले

# मानसी महिला पतसंस्था सन्मानित!



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

मानसी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगर या संस्थेला महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने रामोजी फिल्म सिटी हैदराबाद येथील समारंभात मिलिंद कांबळे अध्यक्ष कॉसमॉस बँक,काकासाहेब कोयटे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्या हस्ते दीपस्तंभ पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले.मानसी पतसंस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी देवेश इनामदार व शाखाधिकारी कृष्णनाथ मुळे यांनी स्वीकारला.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या मानसी महिला पतसंस्थेला ५० कोटी गटातून सलग चौथ्या वर्षी हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.मानसी महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ संगीता देवेंद्र इनामदार,उपाध्यक्ष अश्विनी गणेश मडके ,संचालिका सौ.रजनी शेवेतेकर, सौ.शीला तांबे, सौ सुनीता देवकर, सौ प्रणिता मुळे ,सौ राधिका कुलकर्णी, सौ अर्चना गीरवलकर,सौ आरती कावसानकर,सौ पार्वती दारुणकर, कु साक्षी बेतवार,सौ दक्षा श्रॉफ ,सौ रश्मी कडेठाणकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# केजमध्ये ठाकरे शिवसेनेचा मेळावा

## पडघम : भगवा फडकविण्यासाठी सज्ज राहा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघात भगवा फडकवण्या करिता शिवसैनिकांनो सज्ज राहा जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचे आवाहन केले शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब, युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना नेते सुनिलजी प्रभू साहेब, शिवसेना उपनेते मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर, शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमाताई अंधारे, लोकसभाप्रमुख सुनिल दादा धांडे, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.०६/०८/२०२४ रोजी भगवा सप्ताहात तिसऱ्या दिवशी शिवसेना बीड



संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब,व जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत आज शिक्षक पतपेढी येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा शिवसेनेचा मेळावा आयोजित करण्यात आला होता संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांनी शिवसेनेची 'मशाल' हे चिन्ह गाव खेड्यात पोहचवण्याचे व येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज रहावे असे आवाहन केले.

## योजना : अर्जांची छाननी करुन स्वीकृती संदेश

# लाडक्या बहिण योजनेचे पैसे होणार जमा!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून ९४.३४ % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्हयात सुरू असून याअंतर्गत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून ३,३२,८९२ लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत ९४.३४ %टक्के काम झालेले आहे.

ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती



दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे स्वीकृती असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड असा मोबाईल संदेश आलेला आहे त्यांनी तात्काळ नारी शक्ती दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ऍप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

# पतसंस्था पुरस्काराने सन्मानित



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात ग्राहकांना बदलत्या काळानुसार आत्याधुनिक डिजिटल सेवा उपलब्ध करून देतांना ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरत अविरत विश्वास पुर्ण सेवा देऊन ग्राहकांच्या आर्थीक व्यावहार बाबत चोख कामगिरी करणाऱ्या राजर्षी शाहू नागरि पतसंस्थेने मराठवाडा विभागातून द्वितीय क्रमांकाचा राज्यस्थरीय दिपस्थंब पुरस्कार मिळवून सहकार क्षेत्रात सुवर्णाक्षराने आपल्या नावाचा ठसा प्रथमच उमटविला आहे .संस्थेसाठी गौरवास्पद कामगिरी ठरली आहे . संस्थेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रा मध्ये जिल्हभरात विस्तृत होत असतांना कार्यकुशलतेने आपल्या गुणग्राहकतेचा ठसा उमटावत ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे . दरवर्षी भरीव कामगिरी करत असतांना पुरस्काराच्या निमित्ताने संस्थेच्या सेवांचे व कार्याचे कौतुक सर्व स्तरातून होत आहे . संस्थेच्या भविष्यातील कार्यासाठी हा पुरस्कार प्रेरणादायक ठरणार आहे . देशातील सर्वात मोठ्या कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे व राज्य फेडरेशन चे अध्यक्ष काकासाहेब कोयटे व गोदावरी बँकेचे चेअरमन राजश्रीताई पाटील यांच्या शुभहस्ते ४ ऑगस्ट रोजी संस्थेच्या वतीने अध्यक्ष वंसतराव निर्मळ व मुख्यकार्यकारी अधिकारी अनिल शिवाजीराव जाधव यांनी पुरस्कार स्विकारला आहे. संस्थेचे अध्यक्ष वंसतराव निर्मळ यांनी हा पुरस्कार संस्थेच्या सर्व सभासदांना समर्पित केला आहे .

## निफाड येथे १० ऑगस्टला जिल्हास्तरीय लाठी अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी आणि प्रशिक्षण वर्ग

**निफाड :** नाशिक जिल्हा लाठी असोसिएशन नाशिक व लाठी असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी जिल्हा स्तरीय अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी व प्रशिक्षण वर्ग नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका येथील सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न होत आहे. या राज्य स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्याचा संघ सहभागी होत आहे. यासाठी १० ऑगस्ट (शनिवार) रोजी सकाळी १० वाजता ८ वर्ष, १० वर्ष, १२ वर्षे, १४ वर्ष, १६ वर्ष, १८ वर्ष व सीनियर गट लाठी खेळाडूंनी आपल्या किटसह उपस्थित राहावे,या स्पर्धेसाठी जन्म पुराव्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विहित नमुन्यामध्ये इंग्रजी व मराठी मध्ये असलेल्या जन्मतारखेची नोंद असलेले प्रमाणपत्र, आधार कार्ड, ग्रामपंचायत किंवा नगरपालिका जन्म प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. या चाचणी स्पर्धेसाठी अधिक माहिती साठी विलास गायकवाड यांच्या कडे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलाल चोरडिया, मुख्याध्यापिका ज्योती बागडे तसेच लाठी इंडिया ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष गुरू अजय आर शहा, राष्ट्रीय निर्णायक सुधीर कांबळे, प्रतीक्षा कोटकर, रमेश वडघुले उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत खेळाडूनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन नाशिक जिल्हा लाठी असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड यांनी केले आहे.

## वेचक

### पिंच्याक सिल्याट क्रीडा स्पर्धेत नाशिकच्या हर्षवर्धन जोशीला कास्य पदक



**नाशिक :** दि. २ ते ४ ऑगस्ट २०२४ या दरम्यान ८ वी फेडेरेशन कप पिंच्याक सिल्याट जुनिअर, सिनियर स्पर्धा इंडोर मल्टिपर्पज स्टेडियम, एन डीएम ग्राउंड, लेह लडाख एथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता व सुवर्ण, रजत, व कास्य पदक मिळवून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यामध्ये नाशिकचा खेळाडू हर्षवर्धन जोशी याने सोलो या खेळ प्रकारात कास्य पदक पटकावून इतिहास रचला आहे. या खेळाडूला मार्गदर्शन करणारे नागेश बनसोडे व इंडियन पिंच्याक सिल्याट फेडेरेशन चे अध्यक्ष किशोर येवले यांनी या खेळाडूचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### बालक विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम निर्माण व्हावे; गुरू पूजन सोहळ्यात महामंडलेश्वर सोमेश्वरानंद सरस्वती महाराज यांचे प्रतिपादन



**त्र्यंबकेश्वर :** सालाबादाप्रमाणे या ही वर्षी स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वती गुरूकुल,त्र्यंबकेश्वर येथे गुरु पूजन महोत्सव मोठ्या उत्साहात नुकताच साजरा झाला.



श्रीराम शक्तिपीठ संस्थानचे राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरू व मातृ पितृ पूजन महोत्सव साजरा करण्यात आला.
बालक विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम निर्माण व्हावे, यासाठी विद्यार्थ्यांवर गुरु पूजनातूनच देश प्रेमाचा संदेश जाईल. असा दृढ विश्वास गुरु पूजन सोहळ्यात महामंडलेश्वर सोमेश्वरानंद सरस्वतीनी महाराज यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केला.
या वेळी गुरूकुलातील सर्व पालक उपस्थित होते. बालक विद्यार्थ्यांनी आपापल्या आई-वडिलांचे, पालकाचे पाय धुवून पूजन केले. या वेळी गुरूकुलाचे चेअरमन स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज. (पंचायती अखाडा श्री निरंजनी), महन्त उदयगिरी महाराज, ठाणापती जुना अखाडा महन्त विष्णुगिरी महाराज, महन्त श्रीनाथानन्द सरस्वती महाराज, महंत सिद्धेश्वरानन्द सरस्वती महाराज, महन्त सुदर्शनानन्द सरस्वती महाराज, महंत रामानंद सरस्वती महाराज, प्रिन्सिपल योगिता अग्रवाल माजी, उपनगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार सोनवणे, सर्व शिक्षक वर्ग, तसेच सी.ए प्रदीप परदेशी, ह.भ.प. रविंद्र महाराज नन्नवरे, हिरामण ढगे, पोपट जाधव, बाळासाहेब बोराडे, रमेश बोराडे, भालचंद्र पाटील, पोपट बदादे, व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमा नंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.वरील स्कूल इंग्लिश मिडीयम आहे. विद्यार्थी शालेय ड्रेसवर तर विद्यार्थ्यांचे पाल्य नटून थटून या उत्सवात हजर होते.

# दुय्यम निबंधक कार्यालयाची दुटप्पी भूमिका

## रचना भूखंड व्यवहाराविरुद्ध गुन्हा, जोशी प्रकरणात चुप्पी का?

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

नाशिक डायोसेशन सेशन भूखंड कांड प्रकरणातील राघवेंद्र जोशी यांनी करारावर घेतलेल्या १ हजार वाराच्या दस्त नोंदणी प्रकरणी दीड वर्षांपूर्वी ट्रस्टचे माजी संचालक सतीश काळसेकर यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी कैलास दवंगे यांच्याकडे तक्रार केली होती.मात्र काळसेकर यांच्या तक्रारीची कुठलीही दखल घेण्यात आली नाही. याप्रकरणी नोंदणी व मुद्रांक विभागाने वेळीच दखल घेतली असती तर ट्रस्टचे भूखंड भूमाफियांच्या घशात गेले नसते. नोंदणी विभागातील कथित भ्रष्ट कारभारामुळेच डायोसेशनच्या भूखंडांवर भूमाफियांना बेकायदेशीर कब्जे घेतले आहेत. अशा अनेक प्रकरणा पैकी केवळ रचना शाळेच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रचना आणि जोशी ही दोन्ही प्रकरणे एकाच जातकुळीतील आहेत,अशी कबुली जोशी यांनी स्वतःच प्रहारशी बोलतांना दिली असताना या दोन्ही प्रकरणांना वेगळा न्याय का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. राघवेंद्र जोशी यांच्याबाबत नरमाईची भूमिका घेण्यात आल्याने महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय घेतला जात आहे.

**काय आहे तक्रार:** नाशिक डायोसेशन ट्रस्टचे माजी संचालक सतीश काळसेकर यांनी ४ जानेवारी २०२३ रोजी या प्रकरणी तक्रार देऊन भूमाफियांच्या या बनावट करनाम्यांना विरोध दर्शविला होता. काळसेकरांनी आपल्या तक्रारीत म्हटले होते की,सन २०१५ मध्ये नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रा. लि. ही कंपनी स्थापन करण्यात आली होती. परंतु बेजबाबदार संचालकांनी केलेल्या गैरव्यवहारांबद्दल शासनाने कामकाज करण्यास बंदी आणली होती. असे असताना २० मार्च २०२० रोजी दुय्यम निबंधक संजय ठाकरे यांनी दस्त क्रमांक २४७६/२०२०हा राघवेंद्र जोशी यांना तब्बल ९९९ वर्षाच्या कराराने नोंदवून दिला आहे. काळसेकर यांनी ही तक्रार ४जानेवारी २०२३ रोजी मुद्रांक जिल्हाधिकारी कैलास दवंगे यांच्याकडे दिली आहे. दिलेल्या तक्रारीत अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले असून कंपनीच्या कारभाराविषयी त्यांनी काही गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.



**डायोसेशन भूखंड कांड**

कंपनी २०१५ मध्येच बंद झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष करत काळसेकरांनी न्यायालयात दाद मागावी असा अजब सल्ला दुय्यम निबंधक विजय राजुळे यांनी आपल्या अहवालात दिला. याप्रकरणी ट्रस्टने देखील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ट्रस्टने मांडलेल्या मुद्द्यांकडे देखील नोंदणी विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे जिल्ह्या नोंदणी व मुद्रांक विभाग भूमाफियांच्या दावणीला बांधल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान रचना शाळेच्या संदर्भात दुय्यम निबंधक प्रमोद वामन यांनी फिर्याद देऊन मास्टरमाइंड अजय श्रीवास्तव आणि जवाहर उजागरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र राघवेंद्र जोशी प्रकरणाचा तत्कालीन मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांना सोईस्कररित्या विसर पडल्याचे दिसून येत आहे. राघवेंद्र जोशी प्रकरणात देखील दस्त नोंदणी जवाहर उजागरे या तोतया ट्रस्टीने करून दिली आहे. त्यामुळे राघवेंद्र जोशी प्रकरणात देखील गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे.

या संदर्भात दै. प्रहारने वृत्त मालिका सुरु केल्यानंतर मास्टरमाईंड अजय श्रीवास्तव आणि जवाहर उजागरे यांनी जेवढे भूखंड बेकायदेशीर पद्धतीने विक्री केले आहेत, त्या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भूखंड घेणाऱ्यांचे धाबे दणाणले असून यामध्ये श्रीवास्तव आणि उजागरे यांनी केलेले व्यवहारांची तपासणी केली जाणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# महावितरण आणि ठेकेदाराचा निष्काळजीपणा दोन जीवावर बेतला

**चांदवड तालुक्यातील विटावे येथे पोल उभा करताना दोन मजुरांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू**



११ केव्हीच्या खालीच ४४० व्होल्ट लाईन पोल उभा करताना घडला अपघात.



विद्युत निरीक्षक व कार्यकारी अभियंता घटनास्थळाची पाहणी करताना.

### अकरा केव्हीच्या खाली ४४० वीजवाहिनीच्या पोलला परवानगी कशी?

सदर अपघात स्थळी अकरा केव्हीच्या विजतारांच्या अगदी खालीच ४४० व्होल्ट विजवाहिनीचा पोल उभा करण्याचे काम सुरू होते. त्यामुळे या नियमबाह्य कामाला कोणी परवानगी दिली. या कामाच्या आधी सर्वे कोणी केला? यास जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात उपस्थित झाले आहेत.

या घटनेबाबत सबंधित कनिष्ठ अभियंता गौरव गायकवाड यांच्याशी चर्चा केली असता संबंधित कामाची कुठली ही माहिती नव्हती. किंवा कोणतीही परवानगी दिली नसल्याचे सांगत वर हात केले. यावरून परवानगी नसताना ठेकेदार संबंधित विद्युत काम करीतच कसे होते असा प्रश्न उपस्थित होतो. तसेच ठेकेदारांची मनमानी वाढली की अधिकाऱ्यांनी अकार्यक्षमतेचा कळस गाठला? असा प्रश्न कायम आहे. तालुक्यातील गावांमध्ये विद्युत वाहिनीचे काम सुरू असून अशोका कंपनी मार्फत हे काम चालू आहे.

◆ **चांदवड (प्रतिनिधी):**

चांदवड तालुक्यात विटावे येथे विद्युत वाहिनेचे काम सुरू असताना झालेल्या दुर्घटनेत नंदुरबार जिल्ह्यातील दोन मजुरांचा मृत्यू झाल्याची घटना आज दि.६ रोजी सकाळी अकरा वाजता घडली. याबाबत चांदवड पोलिसांत ठेकेदार, वायरमन व ट्रॅक्टर चालक यांच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील विटावे गावातील गावठाण डीपी परिसरात खासगी ठेकेदारामार्फत विद्युत वाहिनीचे मंगळवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास काम सूरू होते. हे काम सुरू असताना विद्युत पुरवठा बंद असल्याचा परवाना संबंधीत ठेकेदाराकडून बंधनकारक असताना तसे न करता ठेकेदाराने काम सुरू ठेवले.

यावेळी ११ केव्हीच्या विजतारांच्या खालीच ४४० व्होल्ट लाईनचा सिमेंट पोल उभा करीत असताना अकरा केव्हीच्या विजतारांना स्पर्श झाल्याने खांबात विद्युत प्रवाह उतरल्याने खांब उभा करीत असलेले केवलसिंग उर्फ केवल्या सोत्या पाडवी (२७ राहणार देवमोगरा नगर ता. अक्कलकुवा जिल्हा नंदुरबार व सुनील खुमा वळवी (२२ वर्ष राहणार आशिष नगर ता शहादा जिल्हा नंदुरबार) या दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. यांनतर दोघाही मजुरांना चांदवड उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला व प्रथम दर्शनी या घटनेत दोषी असलेले ठेकेदार दत्तू नामदेव पवार (रा.रायपूर); वायरमन उजवल मधुकर ढेमे (रा. चांदवड) ट्रॅक्टर क्रेन चालक भावराव रमण खुरसने (रायपूर). या तिघांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विटावे येथील घटनेबाबत महावितरणचे विद्युत निरीक्षक बी. के. उगले व उपअभियंता उमेश पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी उपलब्ध असलेल्या परिस्थिती जन्य पुराव्याचा विचार करता, विद्युत पुरवठा बंद न करता निष्काळजीपणे वीज नियमांचे उल्लंघन केल्याचे काम केले असल्याची प्राथमिक माहिती विद्युत निरीक्षक उगले यांनी दिली. याबाबतचा अहवाल वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठांकडे सुपूर्त करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अंबड व सातपूर एमआयडीसीमधील विविध समस्या लवकरच सोडविणार : मंत्री उदय सामंत



◆ **सिडको (प्रतिनिधी):**

अंबड व सातपूर एमआयडीसी मधील विविध समस्या लवकरच सोडविण्यात येतील असे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले . मुंबई मंत्रालय येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली सातपूर अंबड एमआयडीसी विविध समस्याबाबत आमदार सीमा हिरे यांच्या समवेत मंगळवारी बैठक संपन्न झाली.

नाशिक एमआयडीसी परिसरातील वाहतुक कोंडी सुटावी, वाहतुकदार, चालक यांना औद्योगिक वसाहतीत तसचे ट्रक टर्मिनलमध्ये सारथी केंद्र निर्माण करण्यासाठी वाहतुक संघटने कडून सातत्याने पाठपुरावा मात्र प्रशासनाच्यावतीने कुठलीही ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याने जिल्हातील वाहतुकदारांमध्ये प्रचंड असंतोष पसरत आहे.या औद्योगिक ठिकाणी ना नफा ना तोटा तत्तावर नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनला देण्याबाबत मंत्री उदय सामंत यांच्या समवेत आ.सीमा हिरे यांनी बैठक घेवून सदरचा वाहनतळ लवकरात लवकर सुरु होणे करिता विनंती केली. सदरचा टर्मिनल लवकरचसेवेत येणार असल्याचे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

याप्रसंगी एमआयडिसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, सोनाली मुळे, बाळासाहेब झंजे, किरण जाधव, नितीन गवळीसह नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र फड, पी.एम. सैनी, वरिष्ठ उपाध्यक्ष शंकर धनावाडे, सचिव रामभाऊ सूर्यवंशी, सल्लागार बजरंग शर्मा, कोषाध्यक्ष दलजीतसिंग मेहता, उपाध्यक्ष भगवान कटीरा, सल्लागार आदी पदाधिकारी प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## नाशिक कलानिकेतन हे कलेचे प्रमुख केंद्र व्हावे : खा. राजाभाऊ वाजे

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

चित्रकलेचे विद्यार्थी आणि कलाकार या सर्वांच्या विचाराने कला महाविद्यालयास स्वतंत्र जागा असावी. त्यामुळे कलाक्षेत्रातील सर्व अभ्यासक्रम एका छताखाली सुरू करता येतील. नाशिकमध्ये कलाक्षेत्रात व कलाज्ञान देणारे एक प्रमुख केंद्र म्हणून नाशिक कलानिकेतन संस्थेचे नाव होऊ शकते. त्यासाठी शक्य तेवढे सगळे प्रयत्न करू व ते पूर्णत्वाकडे घेऊन जाऊ असे प्रतिपादन खा. राजाभाऊ वाजे यांनी केले. नाशिक कलानिकेतन संचलित चित्रकला महाविद्यालयास खा. राजाभाऊ वाजे यांनी सदिच्छा भेट दिली. कला महाविद्यालयाची पाहणी करताना त्यांनी कलादालनातील चित्रांचा अनमोल ठेवा खूप उत्साहाने पाहिला.हा चित्रसंग्रह सर्वांना पाहता येईल, याचा फायदा सर्व कलावंत, कलारसिक यांना मिळावा यासाठी एक सुसज्ज कलादालन येथे हवे असे मत खा.वाजे यांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश सूर्यवंशी यांनी केले. संस्थेचे सचिव प्रा. दिनकर जानमाळी यांनी स्वागत, प्रास्ताविक केले.

# आई-वडिलांनी गावाला नेले नाही, याचा राग आल्याने १३ वर्षीय मुलाची आत्महत्या

**मोठा भाऊ शाळेत गेल्यानंतर 'अनिकेतने' घरात घेतला गळफास**



◆ **सातपूर (प्रतिनिधी):**

कालचं सातपुर शिवाजी नगर येथील दोघा शाळकरी मुलांचा बांधकामाच्या खड्ड्यात पाण्यात पोहतांना धक्कादायक मृत्यूच्या घटनेची चर्चा सर्वत्र अद्याप सुरू असतांनाच, सातपुर औद्योगिक परीसरातील प्रबुद्धनगर (महिंद्रा झोपडपट्टी) याठिकाणी राहणारा अनिकेत अर्जुन पाईकराव वय १३ रा. महात्मा गांधी चौक, प्रबुद्धनगर याने घराच्या छताला ओढणीच्या साहाय्याने मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मृत अनिकेत याचे आई- वडील हे अर्जुन पाईकराव हे औरंगाबाद येथे गावाकडे निघाले. तेंव्हा त्यांचा मुलगा अनिकेत हा मलाही तुमच्या सोबत गावाला यायंच आहे. असा अतिहट्ट करत होता. परंतु त्याच्या आई-वडिलांनी अनिकेत व त्याचा मोठा भाऊ यांना घरीचं ठेवून गावाकडे निघुन गेले. अनिकेतला "मला गावाला नेलेचं का नाही" याचा प्रचंड राग आलेला होता.

दरम्यान अनिकेत याचा मोठा भाऊ सकाळी शाळेत गेल्यानंतर, सकाळी ९ वाजेच्या सुमारास अनिकेत याने आपल्या रहात्या घरातचं गळफास घेऊन आत्महत्या केली. अनिकेत हा इयत्ता सातवी मध्ये प्रबुद्ध नगर मधील मनपा शाळेत शिकत होता. दुपारच्या सुट्टीत अनिकेतचा मोठा भाऊ शाळेतुन घरी आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. अवघ्या १३ वर्षीय अनिकेत या मुलाने गळफास घेतल्याने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी सातपुर पोलिस ठाण्यात उशिरापर्यंत तक्रार दाखल करण्याचे काम सुरू होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सातपूर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# अंदरसूल येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या शिबिराला मोठा प्रतिसाद

**३३ हजार ५८६ अर्ज मंजूर; प्रशासकीय समितीचे सदस्य शेळके पाटील यांची माहिती**

◆ **येवला (प्रतिनिधी):**

तालुक्यातील अंदरसुल येथे मंगळवारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे प्रशासकीय समितीचे सदस्य शिवसेना तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील, महिला बालकल्याण विभागाच्या वंदना शिंपी, पुरवठा विभागाच्या कुलकर्णी उपस्थित होते. शिंपी यांनी योजनेच्या संदर्भात महिलांना मार्गदर्शन केले. तर प्रशासकीय समितीचे सदस्य शेळके पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये प्रत्येक सर्वसामान्य घटकाला योजनेच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम राज्य सरकारच्या वतीने कसे योग्य पद्धतीने चालू आहे याचे विश्लेषण केले. याच बरोबर मुख्यमंत्र्यांनी अनेक जनकल्याणकारी योजना कशा थेट



लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या, या संदर्भात उपस्थित अंदरसुलकरांना मार्गदर्शन केले. महामंडळामध्ये मोफत बस सेवा असो, मुलींच्या मोफत शिक्षणाच्या बाबतीत घेतलेला निर्णय असो की लेक लाडकी योजना असो आणि आत्ता नुकतीच जाहीर झालेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, या सर्व योजना सर्व सामान्य घटकांसाठी मुख्यमंत्री राज्यात प्रभावीपणे राबवत असल्यामुळे सर्वसामान्य घटकांमध्ये एक आनंदाचे वातावरण या माध्यमातून राज्यभर तयार झाले असल्याचे तालुकाप्रमुख शेळके यांनी सांगितले. या शिबिराच्या माध्यमातून संपूर्णपणे कागदपत्रांची पूर्तता करून दिली जात आहे. तसेच यामध्ये महत्त्वाचा विषय रेशनच्या बाबतीत देखील नाव कमी करणे, नवीन नाव समाविष्ट करणे हे देखील तात्काळ करून दिले जात आहे. म्हणून या शिबिराला मोठा प्रतिसाद तालुक्यामध्ये मिळत आहे. या योजनेचे जवळपास ३३ हजार ५८६ अर्ज मंजूर झाले आहेत. याचमुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद या योजनेला मिळत आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अमोल सोनवणे यांनी केले.तर आभार येथील सरपंच कविता कचरे यांनी मानले.यावेळी अंदरसुल येथील शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अमोल सोनवणे, सरपंच कविता कचरे,येथील जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राधाकृष्ण सोनवणे, भाजपाचे तालुका सरचिटणीस महेश देशमुख, उपसरपंच संजय ढोले, शिवसेना उपतालुकाप्रमुख संतोष गोरख वल्टे, शहर प्रमुख संदीप शेळके, किशोर बागुल, राजू पवार, भाऊसाहेब कचरे, भाजपाचे संतोष केंद्रे, कमलाकर देशमुख, शंकरराव गायकवाड, काकासाहेब देशमुख, नितीन जाधव, महेंद्र देशमुख, लाला पठाण, रशीद पठाण, अमोल गोपीनाथ सोनवणे, एकनाथ सोनवणे, एकनाथ जानराव, नारायण दादा देशमुख, कमलेश पाटील तलाठी, किरण बनकर, तलाठी मोहिते भाऊसाहेब, झाल्टे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, व अंदरसुल येथे महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शृंगेरी जगद्गुरूंच्या जन्मोत्सवानिमित्त ८ व ९ रोजी विविध कार्यक्रम

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

पंचवटीतील शृंगेरी शंकराचार्य मठामध्ये विद्यमान जगद्गुरु शंकराचार्य श्री श्री भारती तीर्थ महास्वामीजी यांच्या पूर्ण आशीर्वादाने पीठाधीश्वर झालेले जगद्गुरु शंकराचार्य श्री श्री विधुशेखर भारती महास्वामीजी यांच्या ३२ व्या वर्धापन दिना निमित्ताने विश्व कल्याणार्थ गुरुवार दि. ८ व शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट रोजी गणपती पूजन, गुरु पादुका पूजन, महा अभिषेक, एकादशनी रुद्राभिषेक दशांश होम, महाप्रसाद आदि कार्यक्रम होणार आहेत.

तसेच दि. ९ रोजी प्रातः गणपती होम अमृत मृत्युंजय हवन , आयुष्य होम, नक्षत्र होम, नवग्रह होम, श्री सूक्त हवन, गुरु पादुका पाद्यपूजन आरती व महाप्रसाद असा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी वेद ब्रह्मर्शी शरदचंद्र भट्ट महागुरुजी, उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख आचार्य वेदमूर्ती शांताराम भानोसे, महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठान सर्व विद्यार्थी, वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी, वेदाचार्य दिनेश गायधनी, वेदमूर्ती संतोष जोशी गुरुजी आदि विद्वान उपस्थित राहणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शृंगेरी मठाचे व्यवस्थापक राम गोपाल अय्यर यांनी केले आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# रक्ताने माखलेला मृतदेह बॅगेत घेऊन तुतारी एक्स्प्रेसमध्ये चढत होते तरुण

## बॅग त्यांना झेपेना : पोलिसांच्या चाणाक्ष नजरेनं काळंबेरं हेरलं, बॅग उघडताच सर्वच हादरले

**मुंबई:**



कायम गर्दीने गजबजलेल्या दादर रेल्वे स्थानकात सोमवारी एक धक्कादायक घटना घडली. याठिकाणी तुतारी एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी निघालेल्या दोन प्रवाशांकडील ट्रॉली बॅगेत रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली होती. ही हत्या पायधुनी परिसरात घडल्यामुळे या प्रकरणाचा तपास पायधुनी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. अवघ्या चार तासांत या गुन्ह्याची उकल पोलिसांनी केली असून त्याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे.

दादर रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ११ येथे दोन मूकबधीर व्यक्ती तुतारी एक्स्प्रेसमध्ये चढत होते. या दोघांकडे चाकं असलेली एक बॅग होती. मात्र, ही बॅग ट्रेनमध्ये चढवताना या दोघांची प्रचंड दमछाक झाली होती. बॅगेच्या प्रचंड वजनामुळे या दोघांना ही बॅग तुतारी एक्स्प्रेसमध्ये चढवताना चांगलाच घाम फुटला होता. त्यावेळी या फलाटावर रेल्वे सुरक्षा दलाचे जवान संतोषकुमार यादव आणि पोलीस अंमलदार माधव केंद्रे हे गस्तीवर होते. त्यांना या दोन्ही व्यक्तींची हालचाली बघून संशय आला.


त्यामुळे त्यांनी या दोघांना थांबवून बॅग उघडायला सांगितली. ही बॅग उघडल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला. या बॅगेत रक्ताने माखलेला एक मृतदेह कोंबून ठेवला होता. या मृतदेहाच्या डोक्यावर गंभीर घाव होते. पोलिसांनी संबंधित व्यक्ती आणि बॅग ताब्यात घेऊन पुढील तपासाला सुरुवात केली. या तपासणीत हा मृतदेह अर्शद अली सादिक अली शेख (वय ३०) याचा असल्याचे समजले. अर्शद हा सांताक्रुझच्या कलिना परिसरात राहायला होता.


शिवजित सिंग आणि प्रवीण चावडा या दोन मूकबधिरांनी सादिक अली शेख याची हत्या केली. त्यानंतर या दोघांनी त्याच्या मृतदेहाची कोकणात नेऊन विल्हेवाट लावायचे ठरवले होते. त्यासाठी दोघांनी अर्शदचा मृतदेह बॅगेत भरला आणि ते तुतारी एक्स्प्रेसने कोकणात निघाले होते. मात्र, पोलिसांनी संशय येऊन त्यांनी दोघांना हटकल्याने हा सगळा प्रकार उघडकीला आला. प्राथमिक तपासात शिवजित सिंह आणि प्रवीण चावडा या दोघांनी मिळून अर्शद अली शेख याची हत्या केल्याचे समजले. शिवजित सिंह घटनास्थळावरुन पळून गेला होता. मात्र, पोलिसांनी प्रवीण चावडा याच्याकडून माहिती घेऊन त्याला उल्हासनगरमधून ताब्यात घेतले. गुन्ह्यासाठी वापरलेले हत्यारही पोलिसांनी जप्त केले आहे. आता याप्रकरणाची पुढील तपासणी करुन पोलिसांकडून शिवजित सिंह आणि प्रवीण चावडा या दोघांवर आरोपपत्र दाखल करुन त्यांना न्यायालयासमोर हजर केले जाईल.

# छ.शिवरायांना अनोखी मानवंदना

## कंदीलपुष्प कुळातील नव्या प्रजातीच्या वनस्पतीचे 'शिवरायीना' असे नामकरण

**कोल्हापूर (वृत्तसंस्था) :**





छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी आणि त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशाळगडावर सापडलेल्या एका नवीन प्रकारच्या वनस्पतीला आता छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आले आहे. या नवीन प्रजातीचे 'सेरोपेजिया शिवरायीना' असे नामकरण करण्यात आले आहे. अशा प्रकारे एका वनस्पतीच्या प्रजातीला आंतरराष्ट्रीय पातळीवर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची ही पहिलीच वेळ आहे. कंदीलपुष्प कुळातील या वनस्पतीला शिवरायांचे नाव देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आम्हाला संधी मिळाली, असे मत या संशोधकांनी व्यक्त केले आहे.

कोल्हापुरातील न्यू कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातील अक्षय जंगम, रतन मोरे, डॉ. निलेश पवार यांच्यासह चांदवड येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. एस. आर. यादव यांच्या संघाने या कंदीलपुष्प वर्गातील वनस्पतीचा शोध लावला आहे. विशेष म्हणजे या संदर्भातील शोधनिबंध न्यूझीलँड येथील प्रकाशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यामुळे या वनस्पतीची आंतरराष्ट्रीय पातळीवरील शास्त्रज्ञांकडून देखील दाखल घेतली जाणार आहे.

अक्षय जंगम आणि डॉ.निलेश पवार हे गेल्या सहा वर्षापासून कोल्हापूर जिल्ह्यातील विविध वनस्पतींचा अभ्यास करत आहेत. अशाच कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगडावर वनस्पतीचा अभ्यास सुरू असताना त्यांना ही वनस्पती आढळली. ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदीलपुष्प वर्गातील ही वेगळी वनस्पती असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी कोल्हापूरचे आणि सध्या नाशिक येथे कार्यरत असलेले या विषयातील तज्ञ डॉ. शरद कांबळे यांनी या वनस्पतीची माहिती दिली. डॉ. शरद कांबळे यांनी देखील या वनस्पतीची पाहणी केली. त्यांनीच ही नवीन प्रजातीची वनस्पती असण्याची शक्यता वर्तवली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव यांनी आतापर्यंत सहा नवीन प्रजाती शोधून काढल्या आहेत. त्यांनी निरीक्षण केल्यानंतर ही नवीन वनस्पती असल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच हा शोध निबंध प्रसिद्ध करण्यात आला आहे.

# मराठवाड्याप्रमाणे सिंधुदुर्गमधील देवस्थान जमिनीबाबत निर्णय घ्यावा

## 'प्रगत सिंधुदुर्ग'चे अध्यक्ष दयानंद चौधरी यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**कुडाळ (प्रतिनिधी) :**



मराठवाड्याप्रमाणे सिंधुदुर्ग मधील देवस्थान जमिनी बाबत निर्णय घेण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अजित पवार यांच्याकडे 'प्रगत सिंधुदुर्ग'चे अध्यक्ष दयानंद चौधरी यांनी पत्राद्वारे केली आहे या पत्रामध्ये दयानंद चौधरी यांनी म्हटले आहे की, मंगळवार दि. ३० जुलै २०२४ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये मराठवाड्यातील देवस्थान इनाम जमिनी वर्ग एक करून मालकांना देण्याबाबत निर्णय झालेला आहे तसेच वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करण्याबाबतही निर्णय झालेला आहे.

आज सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जवळजवळ ३४० च्या आसपास देवस्थाने असून ती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्या अधिपत्याखाली आहेत. शिवाय धर्मादाय आयुक्त यांच्याकडे असणारी देवस्थाने वेगळीच आहेत. हजारो एकर जमीन या देवस्थान अंतर्गत समाविष्ट आहे. शिवाय वर्ग दोनच्या जमिनी आहेत हा प्रश्न वेगळाच.

असे असताना आज मराठवाड्याकरिता एक न्याय व कोकणासाठी वेगळा न्याय असं का? आज या देवस्थान जमिनीवर शेतकरी शासनाच्या कोणत्याही योजना राबवू शकत नाहीत, कारण देवस्थान जमिनी म्हणून योजनाना मंजुरीच देण्यात येत नाही. या देवस्थान जमिनीवर बँका कर्ज देत नाहीत. त्यामुळे आज या देवस्थान जमिनी ओस पडलेल्या आहेत. असं असलं तरी देवस्थानची सेवा चाकरी मात्र या भाविक जमीनधारकांना करावीच लागत आहे.

महाविकास आघाडीच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रत्नागिरीमध्ये घेतलेल्या सभेमध्ये देवस्थानच्या जमिनीचा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचं आश्वासन दिलं होतं, ते आश्वासन हवेतच विरलं. तरी कोकणातील समस्त शेतकऱ्यांच्यावतीने माझी आपणास विनंती आहे की, जो न्याय शासनाने मराठवाड्याला दिलेला आहे तो न्याय सिंधुदुर्ग जिल्ह्यालाही द्यावा, अशी मागणी 'प्रगत सिंधुदुर्ग'चे अध्यक्ष दयानंद चौधरी यांनी केली आहे.

# दैविक आणि अस्मि कडणे या भावंडांची 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद





**मुंबई :**

दैविक विशाल कडणे (वय १०) आणि अस्मि विशाल कडणे (वय ८) या दोन्ही भावंडांच्या नावे 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' नोंदविण्यात आला आहे. ॲरॉनॉटिक्स सायन्स या विषयावर आधारित कार्यामध्ये हा विश्वविक्रम नोंदवण्यात आला. वैमानिकशास्त्र विज्ञान विषयावर या दोन्ही भावंडांनी केलेल्या कार्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स यांनी घेतली आणि विश्वविक्रम नोंदवला. या विश्वविक्रमात त्यांचा लहान भाऊ देवांश गौरव पोतदार याचादेखील समावेश आहे. या विश्वविक्रमाच्या निमित्ताने कोकण पदवीधरचे आमदार निरंजन डावखरे यांनी या दोन्ही भावंडांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज मान्यवर निर्मिती सावंत, जयवंत वाडकर, पुष्कर श्रोत्री, मुग्धा गोडबोले, अभिनय लक्ष्मीकांत बेर्डे, दिलीप जाधव आदी उपस्थित होते.

# वेंगुर्लेत उद्या नागोबा बनविणे स्पर्धा

## दीपकभाई केसरकर मित्रमंडळ व वेंगुर्ले तालुका शिवसेना पुरस्कृत

**वेंगुर्ले (प्रतिनिधी) :**

शाश्वत सेवा बहुउद्देशीय संस्था सिंधुदुर्ग आयोजित व दिपकभाई केसरकर मित्रमंडळ, सावंतवाडी आणि वेंगुर्ले तालुका शिवसेना पुरस्कृत श्रावण महोत्सव अंतर्गत गुरूवार दि. ८ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता स्वामिनी मंडपम् वेंगुर्ले येथे बालवाडीसाठी नागोबा चित्र रंगविणे तर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चिकण माती पासुन नागोबा बनविणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत बालवाडी गटासाठी रंगभरण स्पर्धा वेंगर्ले तालुक्यातील बालवाडी, अंगणवाडी, ज्यनियर केजी व सिनीयर केजी यामध्ये शिकणाऱ्या चिमुकल्यांसाठी होणार आहे. सर्व स्पर्धकांना आयोजकांकडून नागोबाचे चित्र असला ड्रॉईंगपेपर पुरविण्यात येईल. केवळ आयोजकांनी पुरविलेल्या ड्रॉईंग पेपर वरील नागोबाचे चित्र चिमुकल्या स्पर्धकांनी आपल्या कौशल्याने कलर पेन्सिल व तेलकट खडूंचा वापर करून रंगावायचे आहे. चित्र रंगविण्यासाठी एक तासाची वेळ ठेवण्यात आली आहे.

या स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे ५००, ३००, २०० रोख बक्षिस व चषक व उत्तेजनार्थ दोन क्रमांकांना १५०, १०० अशी बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. प्राथमिक व माध्यमिक गटासाठीची स्पर्धा वेंगुर्ले तालुक्यासाठी मर्यादीत आहे. प्राथमिक व माध्यमिक गटातील मुलांना गणपती मूर्ती बनविण्याच्या चिकण मातीपासून स्पर्धा स्थळी नागोबा बनवायचे आहेत. प्राथमिक गटांत पहिली ते सातवीपर्यतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे तर माध्यमिक गटात आठवी ते दहावीपर्यंतच्या मुलांना प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेसाठी लागणारी चिकण माती स्पर्धकांनी आणावयाची आहे. ती आयोजकांकडून पुरविली जाणार नाही त्यासाठी स्पर्धकांनी विचारणा करू नये. नागोबा एक फुटापेक्षा जास्त उंचीचा नसावा. नागोबा रंगविण्याची गरज नाही. नागोबा बनविण्यासाठी ८० मिनीटांचा वेळ दिला जाणार आहे. या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांनी नियोजीत वेळेत उपस्थित रहावे. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. आगावू नाव नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. या स्पर्धेती प्राथमिक गटांतील प्रथम तीन अनुक्रमे ७००, ५००, ३०० यांना रोख बक्षिसे व चषक व उत्तेजनार्थ दोन व माकांना २००, १०० अशी रोख बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तर माध्यमिक गटांतील प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे १,०००, ७००, ५००, बक्षिसे व चषक व उत्तेजनार्थ दोन क्रमाकांना ३००, २०० अशी रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत.

या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व सहभागासाठी मिताली मातोंडकर-७०६६८०२१५५ यांचेशी संपर्क साधावा. वेंगुर्ले तालुक्यातील शाळा, हायस्कुलमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपल्या अंगीभुत कलागुणांना चालना देण्यासाठी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन शिवसेनेचे जिल्हा समन्वयक सचिन वालावलकर व शिवसेना तालुका प्रमुख नितीन मांजरेकर यांनी केले आहे.

# 'एक राखी सैनिकांसाठी सीमेवरच्या भावासाठी'

## भंडारी ज्युनिअर कॉलेजच्या सातत्यपुर्ण उपक्रमाचे गटविकास अधिकारी आत्मज मोरे यांच्याकडून खास कौतुक



मालवण येथील भंडारी ए. सो. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी भारतीय सैनिकांसाठी बनविलेल्या राख्या वितरित कार्यक्रमात उपस्थितीत मान्यवर. (छाया : अमित खोत)

**मालवण (प्रतिनिधी) :**

भंडारी ए. सो. कनिष्ठ महाविद्यालय मालवणच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही म्हणजे सलग आठव्या वर्षी "एक राखी सैनिकांसाठी- सीमेवरच्या भावासाठी" हा सैनिकांना राख्या पाठवण्याचा कार्यक्रम मंगळवारी संपन्न झाला. यावर्षी विद्यार्थिनींनी २६ हजार २०० राख्या बनवून पाठवल्या आहेत.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मालवणचे गटविकास अधिकारी आत्मज मोरे तसेच मालवणच्या नायब तहसीलदार (महसूल) श्रद्धा चौगुले, पोलीस उपनिरीक्षक संदीप खाडे, भारतीय सेना दलातील सेवानिवृत्त हवालदार तथा देवबागचे उद्योजक राजन कुमठेकर, पोलीस शिपाई प्रभाकर खडपकर, त्याच प्रमाणे संस्थेचे लोकल कमिटीचे खजिनदार जॉन नरोना, ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य एच. बी. तिवले, प्राध्यापक पवन बांदेकर, ग्रंथपाल प्रफुल्ल देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी श्री. तिवले सर यांनी स्वागत केले, तर प्रा. बांदेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी श्रद्धा चौगुले म्हणाल्या, आज सैनिकांमुळेच आपण आनंदाने जगत आहोत, त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने आणि सुरक्षित वातावरणात साजरे करतो. सैनिकांना पाठविलेल्या राख्यांमुळे त्यांचा आनंद वाढतो, त्यांना प्रोत्साहन मिळते, त्यामुळे राख्या पाठविण्याचा उपक्रम अतिशय चांगला व स्तुत्य आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी उद्योजक राजन कुमठेकर, जॉन नरोना, संदीप खाडे यांची समयोचित भाषणे झाली.

यावेळी जास्तीत जास्त राख्या बनविणाऱ्या विद्यार्थी -विद्यार्थिनींचा सत्कार करून भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रफुल्ल देसाई यांनी केले. तर आभार सौ. वैभवी वाक्कर यांनी मानले.

**गटविकास अधिकारी आत्मज मोरे यांच्याकडून खास कौतुक**

देशाच्या सीमेवर पहारा देऊन सैनिक देशाचे रक्षण करत असतात. त्यांच्यामुळेच आपण नागरिक देशात सुरक्षित जीवन जगत असतो. सण उत्सव विसरून सैनिक देश रक्षणाचे काम करत असतात, त्यामुळे सैनिकांसाठी भंडारी एज्युकेशन सोसायटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनिनी बनविलेल्या राख्या या त्यांच्यासाठी आपुलकी, ऊर्जा निर्माण करणाऱ्या ठरतील, असे प्रतिपादन मालवणचे गटविकास अधिकारी आत्मज मोरे यांनी केले.

# पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी अखेर मोठं पाऊल उचललं

## पूजा खेडकर यांच्यावर अब्रु नुकसानीचा दावा

**पुणे :**



राज्यासह देशभरात गेल्या काही दिवसांमध्ये चर्चेचा विषय ठरलेल्या पूजा खेडकर बाबतीत एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे पुजा खेडकरवर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहेत. पूजा खेडकरने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. तशी तक्रार पुजा खेडकरने पोलिसांना दिली आहे आणि यूपीएससीकडे देखील तशी तक्रार केली होती. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण कालावधीत सुहास दिवसेंनी लैंगिक छळ केल्याचा पूजा खेडकरचा आरोप आहे. दरम्यान या आरोपांबाबत चौकशी करणाऱ्या पुणे पोलिसांनी तीन वेळा समन्स बजवून देखील पूजा खेडकर हजर झालेली नाही.

पूजा खेडकरने पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवस यांच्यावर छेडछाडीचा आरोप केला होता. पूजा खेडकरने पुण्याचे जिल्हाधिकारी दिवसे यांच्या विरोधात वाशिम पोलिसात तक्रार दाखल केली. दिवसे यांनी लैंगिक आणि मानसिक छळ केल्याचे पूजा खेडकरनी आरोप केले होते. वाशिम पोलिसांनी महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूजा खेडकरची तक्रार नोंदवून घेतली. मात्र दिवसे यांच्याविरोधातील तक्रार वाशिम पोलीसांच्या कार्यकक्षेत येत नसल्याने ही तक्रार पुणे पोलीसांकडे वर्ग करण्यात आली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी पूजा खेडकरला या तक्रारीसंदर्भात काही चौकशीसाठी तब्बल तीन वेळा समन्स पाठवून देखील ती गैरहजर राहिली होती.

जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध छळवणुकीची तक्रार प्रकरणात प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर तीनदा समन्स बजावूनही पुणे पोलिसांसमोर हजर झाली नाही. पूजा खेडकरनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध वाशिममध्ये छळवणुकीची तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने खेडकरला पुणे पोलिसांकडे जबाब नोंदविण्याचे आदेश देण्यात आले होते.

पुणे पोलिसांनी तिला दोनदा समन्स बजाविले होते. त्यावेळी खेडकरनी पोलिसांकडे काही अवधी मागितला होता. आठवडाभरानंतर पूजा खेडकर पोलिसांसमोर हजर झाली नाही. जबाब नोंदविण्यास उपस्थित रहावे, असे समन्स पोलिसांनी तिला पुन्हा बजावण्यात आले होते. तीनदा समन्स बजावूनही ती हजर झाली नाही. खेडेकरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, तिचा मोबाइल क्रमांक संपर्क क्षेत्राबाहेर असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. त्यानंतर आता दिल्ली पोलिस देखील पूजा खेडकरचा शोध घेत आहेत.

**पूजा खेडकर नातेवाईकांच्या घरी लपून बसली की दुबईला पळून गेली ?**

यूपीएससीने आयएएस पद काढून घेतल्यानंतर आता दुसरीकडे न्यायालयानेही पूजा खेडकरला दणका दिला आहे. पूजा खेडकर गेल्या काही दिवसांपासून फरार आहे. न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर पूजा खेडकर दुबईला पळून गेल्याची चर्चा आहे.

पूजा खेडकरचा न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर ती भारतातून थेट परदेशात पसार झाली असावी, अशी शक्यता अनेक वृत्तपत्रांमध्ये व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पूजा खेडकर वरती अनेक आरोप करण्यात आले आहेत. इतर मागासवर्ग प्रवर्गातून पूजाने खेडकरने १२ वेळा युपीएससी परीक्षा दिल्याचे समोर आले आहे.

# चिंदर सडेवाडी प्राथमिक शाळेस ग्रीन बोर्ड प्रदान

## लायन्स क्लब मालवण आणि पाटीदार समाज यांच्या वतीने भेट




लायन्स क्लब मालवण आणि पाटीदार समाज यांच्या वतीने चिंदर सडेवाडी प्राथमिक शाळेस ग्रीन बोर्ड प्रदान करण्यात आला. (अमित खोत, मालवण)

**मालवण (प्रतिनिधी):**

लायन्स क्लब ऑफ मालवण आणि पाटीदार (पटेल) समाज यांच्या वतीने मालवण तालुक्यातील प्राथमिक शाळा चिंदर सडेवाडी येथे ग्रीनबोर्ड प्रदान करण्यात आला आला.

यावेळी लायन्स क्लब ऑफ मालवणचे अध्यक्ष महेश अंधारी, सेक्रेटरी फॅनी फर्नांडीस, खजिनदार पल्लवी खानोलकर, ज्येष्ठ सदस्या जयश्री हडकर, मुकेश बावकर, पाटीदार समाजाचे शांती पटेल, मोहन पटेल उपस्थित होते. प्रशालेचे विद्यार्थी तसेच मुख्याध्यापिका सौ. शुभांगी लोकरे-खोत, शिक्षिका अन्नपूर्णा गायकवाड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी जयश्री हडकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लायन्स क्लबच्या सामाजिक उपक्रमांची माहिती शिक्षक पालक यांना दिली. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे गाड सर यांनी आभार व्यक्त केले.

शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीनेही सर्वांचे आभार मानण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका करिष्मा कानविंदे, मदतनीस मानसी गोसावी, पालक धनश्री गोसावी व विध्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटपही करण्यात आले.

# पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती

## भदंत धम्मशिल थेरो : श्रावस्ती बुद्ध विहारात वंदना

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव शहरांमध्ये केसापुरी कॅम्प येथील बौद्धांचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहार येथे दर रविवारी साप्ताहिक बुद्ध वंदना आयोजित केली जाते. या वेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची धम्मदेशना संपन्न झाली. दर रविवारी श्रावस्ती बुद्ध विहार येथे सदधम्म सेवा संघाच्या वतीने साप्ताहिक बुद्ध वंदना व धम्मदेशनेचे आयोजन करण्यात येते. या बुद्ध वंदनाच्या त्यावेळी माजलगाव तालुक्यातील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. आजच्या पूजेचे यजमान हे ज्येष्ठ केंद्रीय शिक्षिका आयु.लीलाताई ज्ञानोबा उजगरे व डॉ.चंद्रशेखर ज्ञानोबा उजगरे हे होते.

यावेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांनी उपासिका यांना धम्मदेशना दिली. यावेळी त्यांनी सांगितले की,आपल्यातील द्वेष कपट भावना नष्ट करण्यासाठी आणि वैराची भावना शमविण्यासाठी मनुष्याला प्रेम पूर्ण मैत्री युक्त करुणामय हृदयाची गरज आहे.व तसेच आपल्या मनातील लोभ नष्ट करण्यासाठी उद्दात्त अंतकरणाची गरज असते . तसेच त्याचबरोबर मानवाला पवित्र जीवन जगण्यासाठी शुद्ध चारित्र्याचे गरज आहे . आपण असत्या पासून दूर होण्यासाठी सत्य ते स्वीकारून आपले जीवन मंगलमय करू शकतो.

येणे प्रमाणे जीवन जगत असताना बुद्धांनी सांगितलेल्या पवित्र पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती आहे.असे प्रतिपादन भदंत धम्मशील थेरो यांनी केले. सध्या वर्षावास कालावधी चालू असून दर रविवारी सातत्याने बुद्ध वंदना व धम्मदेशनेचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. तरी माजलगाव तालुक्यातील व परिसरातील बौद्ध उपासक उपाशीकांनी या पवित्र वर्षावास कालावधीमध्ये पान २ वर...







# पहिल्याच प्रयत्नात मिळविला सक्सेस!

## अभिमानास्पद : पुनमची पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील वाहेगाव येथील पूनम बोबडे या शेतकऱ्याच्या मुलीची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे .ह्या यशाबद्दल तिचा व कुटुंबीयांचा रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विलास बापू भुमरे यांच्या हस्ते आज सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भुमरे म्हणाले, की ग्रामीण भागातील पुनम बोबडेने पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कठीण परीक्षेत यश संपादन केले. तिचा आदर्श नक्कीच इतरांनी घेऊन यश संपादन करावे.

यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक अंकुश बोबडे पाटील, चेअरमन अर्जुन बोबडे, ग्रामविकास अधिकारी सागर डोईफोडे,नवगावचे सरपंच किशोर चौधरी, माजी नगराध्यक्ष शहादेव लोहारे ,कृष्णा बोबडे ,चंद्रभान जगताप ,यशवंत नरवडे, परमेश्वर बोबडे, रामेश्वर बोबडे, शिवाजी बोबडे, भगवान सोनवणे, संतोष सोनवणे, संदीपान शिंदे, कल्याण बोबडे ,सुभाष शेळके, माणिक मिसाळ, उपसरपंच राजू मोहिते उपस्थित होते.

# केज बसस्थानकात चढतांना गर्दी !

## दुर्लक्ष : सुरक्षेअभावी गुन्हेगार प्रवृत्तींना फायदा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

चार महामार्गाला जोडणाऱ्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील बस स्थानकावर दररोज हजारो प्रवाशांची जाये होत असतांनाच एसटी महामंडळ, पोलिस यंत्रणा यांच्या दुर्लक्षाने आलेल्या बस मध्ये जागा मिळविण्यासाठी बसच्या दरवाज्यात प्रवाशांची प्रचंड गर्दी होत असल्याचा फायदा दागिने चोर, पाकिटमार यांना होत असल्याचे अनेकदा समोर आलेले असतांनाच अमावास्या निमत्त बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र चारकवाडीला दर्शनास जाण्यासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली यामधून अज्ञात खिसे कापूने धंदा केला खरा पण त्याच्या हाती मात्र चुना, अडकिता आणि तंबाखूची पुडी लागली हा चर्चेचा विषय असला तरी या सर्व प्रकाराला कारणीभूत कोण? असा सवाल मात्र प्रवाशांमधून व व्यक्त केला गेला. या संदर्भात माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील केल येथील बसस्थानक हे चार मार्गाला जोडणारे बसस्थानक आहे. येथून बीड–नगर–मुंबई– छ. संभाजीनगर नव्हे तर लांब पल्ल्याच्या गाड्या जातात. तर कळंबकडे जाणाऱ्या माहामार्गावरून उस्मानाबाद, सोलापूर, बार्शी, पंढरपूर, पुणे अशा लांब पल्ल्याच्या धारूर महामार्गावर तेलगाव माजलगाव परभणी तर अंबाजोगाई महामार्गावरून अंबाजोगाई–परळी–नादेड–लातुर जिल्हा या चारीही पान २ वर...



# मल्टिस्टेटच्या ठेवीदारांना न्याय देण्यात यावा !

## दिलासा : खा.रजनी पाटील यांनी केली मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मराठवाडा व विशेषत बीड जिल्ह्यातील गोरगरीब कष्टकरी, नोकरदार, पेन्शनर यांना मल्टीस्टेट चालकांनी जादा व्याज देण्याचे आमिष दाखवून अनेकांच्या ठेवी ठेवून घेतल्या व आता हे मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाले आहेत मात्र यामध्ये सर्वसामान्य लोक भरडली जात आहेत. कोणी आपल्या मुलीच्या लग्नासाठी पैसे साठवले होते, कोणी आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी पैसे साठवले होते तर कोणी रात्र दिवस कष्ट करून या मल्टीस्टेट मद्ये पैसे ठेवले होते मात्र आता या मल्टीस्टेट चे दिवाळे निघाले आहेत त्यामुळे ज्यांनी या मल्टीस्टेट ला परवानग्या दिल्या त्यांनी या लोकांचे पैसे परत देण्याची देखील जबाबदारी घेतली पाहिजे व सरकारने त्या लोकांना न्याय मिळवून दिला पाहिजे अशा शब्दात कॉंग्रेसच्या नेत्या राज्यसभा खासदार सौ. रजनीताई पाटील यांनी या महत्वाच्या मुद्यावर आज राज्यसभेत आवाज उठवला त्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांतून त्यांचे आभार व्यक्त होत आहेत.



# वीरशैव स्मशानभूमीत खोल्यांचे भूमिपूजन!

## डॉ.योगेश क्षीरसागर : निधी उपलब्ध करून दिल्याने प्रश्न मार्गी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील वीरशैव समाजाच्या स्मशानभूमीमध्ये दोन खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.६) दुपारी ३ वाजता करण्यात आले. स्मशानभूमीमध्ये खोल्या उभारण्याची समाजाची मागणी होती. यासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाने डॉ.क्षीरसागर यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती. क्षीरसागरांनीही समाजभावनेचा आदर करुन खोली बांधकामासाठी तत्काळ १० लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

शहरातील कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस वीरशैव लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे. स्मशानभूमीत अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा, निवारा नसल्याने अंत्यविधीस येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर मोठे हाल होतात. केवळ स्मशानभूमीला कंपाऊंचे काम झालेले आहे. भौतिक सुविधांसोबतच स्मशानभूमीत दोन खोल्या उभारणे गरजेचे आहे. यामुळे वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची भेट घेऊन स्मशानभूमीतील दुरवस्थेबाबत माहिती दिली. पान २ वर...



# मुजमुलेची सामान्य कुटुंबातून यशाला गवसणी

## सक्सेस : भूमी अभिलेख विभागात अभिलेखापालपदी निवड

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे नायगांव येथील अभिजित महादेव मुजमुले याची भूमी अभिलेख विभागात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल या पदासाठी निवड झाली आहे. त्याच्या या निवडीबद्दल सर्वच स्तरामधून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.अभिजित मुळातच होतकरु असल्याने स्पर्धा परीक्षेत सातत्य राखत शासकीय सेवेचे त्याचे स्वप्न साकार झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन सर्वसामान्य कुटुंबातून मेहनतीने हे यश मिळवले.त्याचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर पॉलीटेकनिकचे शिक्षण योगेश्वरी कॉलेज अंबाजोगाई आणि सिव्हिल इंजिनियरिंग–बी टेक हे अहमदपूर येथे पुर्ण झाले.मात्र शिक्षण पुर्ण झाले परंतु मनातील शासकीय सेवेचे स्वप्न शांत बसू देत नव्हते. त्यामुळे २०२३ पासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केला, त्याने अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द न सोडता सातत्यपूर्ण अभ्यास करत भूमी अभिलेख विभागाकडून पान २ वर...



# परळी विधानसभा निवडणूक लढविणार

## राजेभाऊ फड : विकासासाठी घेतला निर्णय

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी आगामी होवू घातलेल्या विधान सभेची निवडणुक महाविकास आघाडीकडूनच परळी मतदारसंघातून लढविणार असल्याची माहिती युवानेते राजेभाऊ फड यांनी आमच्या प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील केंद्र बिंदू म्हणून परळी मतदारसंघ ओळखला जातो. हा मतदारसंघ देशाचे लोकनेत गोपीनाथराव मुंडे यांचा असून त्यांच्या नंतर या मतदारसंघाचा विकास हा फक्त कागदावरच झाला आहे. या मतदारसंघाचा ओळख कागदोपत्री विकास, कायदा सुव्यवस्था, आबाधीत नसल्याचे बोलले जातात. या मतदारसंघाचा विकास बारामतीच्या धरतीवर व प्रत्यक्षात करण्यासाठी पान २ वर...



# कपाशीवर मर रोगाचा प्रादुर्भाववाढला

## कृषी : उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी केली पाहणी



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात कपाशी पिकांवर आकस्मिक मरचा वाढता प्रादुर्भाव झाल्या च्या शेतकऱ्यांच्या तक्रारी नंतर रविवारी सिल्लोड च्या उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांच्या पथकांनी सोयगाव परिसरात पाच गावात पाहणी केली

जुलै महिन्यात सोयगाव सह तालुक्यात कपाशी पिकांवर आकस्मिक मर चा प्रादुर्भाव झाला आहे आगस्ट च्या पहिल्या आठवड्यात प्रादुर्भाव अधिक वाढला आहे यामध्ये कपाशीची झाडे वाळून जळत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे दरम्यान तालुका कृषी विभागाकडे शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारी वरुन उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव यांच्या पथकाने सोयगाव पान २ वर...

# मोबाईल गेम्स, रम्मीचा जुगार बंद करा

## चिंता : सरपंच आण्णासाहेब येवलेंची मागणी

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या मोबाईल वरील गेम्सच्या विळख्यात तरुण मुलं मुली आहेत परिणामी काही आत्महत्या करत आहेत तर काहींचे संसार उद्धवस्त होत आहे.असे सर्वच गेम्स व रम्मीचे गेम्स बंद करावेत असे आवाहन डोंगरकिन्हीचे युवा सरपंच आण्णासाहेब येवले यांनी केले आहे.

मोबाईल वरील गेम्सच्या विळख्यात सापडलेल्या तरुणांना व्यसनाधीनता लागली आहे. अनेक तरुण क्रयशक्ती हीन झाले आहेत. लहानापासुन थोरांपर्यंत मोबाईल चे व्यसन जडले आहे.या मोबाईल च्या वेडापायी कुटुंबातील प्रेमाचा संवाद संपला,पारावरच्या व चावडीतील चर्चा संपली आहे.अनेक तरुण या गेम्स मुळे कर्जबाजारी झाले आहेत. काही तरुणांनी आपली स्थावर मालमत्ता विकून कर्जबाजारी झाले आहेत.शेअर बाजारचे वेडही अनेक तरुणांना रोजगार मिळेल असे वाटते परंतु शेअर ट्रेडिंग च्या नादात काही तरुणांना कर्जबाजारी होऊ लागले आहेत.समाज यामुळे रसातळाला गेला आहे.मोबाईलवर या गेम्सच्या जाहिरात केली जाते.मात्र किती तरुण बर्बाद झाले हे दाखवत नाहीत.यातच मुलींनाही हे व्यसन लागले आहे.मोबाईल कंपन्या मात्र गडगंज संपत्ती कमावत आहेत.महाराष्ट्रातील एका ग्रामीण भागातील गावातुन दोन कोटीचा रिचार्ज एका महिन्यात पान २ वर...



## कार्यक्रम : एसपी बसवराज शिवपुजेंच्या उपस्थितीत उपक्रम

# राहुरीत पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

अप्पासाहेब मकासरे/ राहुरी

पोलीस स्टेशनमध्ये पदोन्नती झालेले व सेवानिवृत्त अधिकारी यांचा सन्मान सोहळा श्रीरामपूर उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ बसवराज शिवपुजे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला देवेंद्र सूर्यकांत शिंदे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची शासनाकडून पदोन्नती देण्यात आली त्यांना पोलिस निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली त्यांची नंदुरबार येथे जात पडताळणी समिती येथे नेमणूक झाल्याने त्यांना राहुरी पोलीस स्टेशन येथे निरोप समारंभ देण्यात आला तसेच सेवा समाप्तीमुळे सेवानिवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक पोपटराव कटारे सहाय्यक फौजदार म्हातारदेव जाधव त्यांनाही निरोप देण्यात आला श्री चंद्रकांत बराटे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी तसेच सेवानिवृत्त झालेले सहाय्यक उप पोलीस निरीक्षक पोपटराव कटारे यांचे चिरंजीव अभिजीत कटारे यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने त्यांचाही सन्मान डॉ पोलीस उपअधीक्षक डॉ बसवराज शिवपुजे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी राहुरी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक संजय ठेंगे रवींद्र पिंगळे संदीप परदेशी धर्मराज पाटील पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत खोडे पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळआधी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक सुदर्शन बोडके यांनी केले पान २ वर...



# महादेव मंदिराचे पुरातत्वीय उत्खनन करा

## डॉ. सतिश साळुंके :शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे केंद्र सरकारच्या पुरातत्वखात्याच्या वतीने बीड जिल्ह्यातील एकमेव संरक्षित स्मारक असणाऱ्या उक्कडपिंपरीच्या चालुक्यकालीन महादेव मंदिराच्या सभोवतालचे पुरातत्वीय उत्खनन केल्यास या मंदिराची भव्यता समोर येऊन जमिनीतील अनेक शिल्पे सापडू शकतात असा दावा इतिहास संशोधक डॉ. सतीश साळुंके यांनी केला. हे मंदिर साधारणपणे ११ ते १२ व्या शतकातल्या चालुक्य राजवटीच्या उत्तर काळातील कालखंडात उभा करण्यात आले असावे असा अंदाज त्यांनी व्यक्त केला . बीड जिल्हा इतिहास परिषदेच्या वतीने उक्कडपिंपरीच्या महादेव मंदिराचा अभ्यास दौरा नुकताच पार पडला.

हे मंदिर त्रिदल पद्धतीचे असून गावकऱ्यांनी मंदिराची केलेली जोपासना याबद्दल परिषदेच्या वतीने गावकऱ्यांचे अभिनंदन केले गेले. यावेळी परिषदेचे कार्यवाह मंगेश रोटे, उपाध्यक्ष अण्णासाहेब गडदे, सहकार्यवाह दीपक सरोदे यांच्यासह अन्य इतिहास प्रेमी उपस्थित होते. श्रावण महिन्यात या मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते.

मंदिराच्या छताला अप्रतिम शिल्पे आहेत. त्यात कृष्णाचे शिल्प अवर्णनीय आहे. या मंदिरावरील शिल्पांचे वैशिष्ट्य म्हणजे शिल्पावर दर्शनी भागावर उंटांची विविध शिल्पे आहेत तर लज्जादेवीची विविध अवस्थेतील शिल्पे असून काही झिजलेली मैथुन शिल्प आहेत. मंदिरांचे स्तंभ विलक्षण आकर्षक व कोरीव नक्षीकामाने सजलेले आहेत. पान २ वर...

